- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

# दैनिक सिंहवाणी वृत्त

प्रखर लेखणीचा साक्षीदार

▸ संपादक (विकास) : श्याम पेठकर ▸ संचालक-संपादक : अजय बिवडे



**Hotel Mai VilLa**
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075


**सोने-चांदी**
- ✔ २४ कॅरेट : १,५३,७०० /-
- ✔ २३ कॅरेट : १,५१,३५० /-
- ✔ चांदी : २,४८,३००/-


Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : शनिवार, १९ सप्टेंबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ८ | वर्ष : १ | अंक : २८० | किंमत : २ रूपये



**सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...**
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६


# शक्तिपीठ महामार्ग : शेतकऱ्यांना चार पट मोबदला

## ग्रामीण भागातील भरपाई बाजारमूल्याच्या चौपट, तर शहरी भागात दुप्पट मिळणार असल्याचे सध्या तरी स्पष्ट

**वृत्तसंस्था, कोल्हापूर**

शक्तिपीठ महामार्गाच्या भूसंपादन आणि भरपाईसाठी शासनाने मार्गदर्शक नियमावली नुकतीच जाहीर केली आहे. त्यात बाधित शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला देताना भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना कायदा, २०१३ आणि महाराष्ट्र महामार्ग अधिनियम, १९५५ मधील लागू तरतुदींचा आधार घेतला जाणार आहे. २०१३ च्या कायद्यानुसार ग्रामीण भागातील भरपाई बाजारमूल्याच्या चौपट, तर शहरी भागात दुप्पट मिळणार असल्याचे सध्या तरी स्पष्ट झाले आहे.




शक्तिपीठ महामार्गासाठी जमीन संपादन करताना प्रथम संबंधित जमिनीचे बाजारमूल्य निश्चित केले जाणार आहे. ग्रामीण भागात लागू कमाल गुणक दोन असल्यास भरपाई बाजारमूल्याच्या चौपट जाऊ शकते. मात्र, प्रत्येक शेतकऱ्याला सरसकट चौपट रक्कम मिळेल, असा याचा अर्थ नाही. जमिनीचा प्रकार, बाजारमूल्य आणि लागू तरतुदीनुसार अंतिम मोबदला ठरवण्यात येणार आहे. महाराष्ट्र महामार्ग अधिनियम १९५५ नुसार महामार्गाची हद्द, बांधकाम रेषा आणि नियंत्रण रेषा निश्चित करण्यात येणार आहे.

### नुकसानभरपाईवर हरकत असल्यास लवाद

महाराष्ट्र महामार्ग अधिनियमानुसार मोबदला निश्चित न झाल्यास भूसंपादन अधिकारी नुकसानभरपाई ठरवतो. नुकसानभरपाई मान्य नसल्यास संबंधित पक्षाला कायद्यानुसार लवादाकडे दाद मागता येते. जमीन राज्य सरकार अधिग्रहण केल्यानंतर महामार्ग प्राधिकरण किंवा अधिकृत व्यक्तीला महामार्गाच्या बांधकाम व संबंधित कामांसाठी जमिनीत प्रवेश करण्याचीही तरतूद आहे.

### ३५ शासन आदेशांचा आधार

भूसंपादन, भरपाई प्रक्रियेच्या अंमलबजावणीसाठी सुमारे ३५ शासन आदेश, नियम आणि कायदेशीर संदर्भांचा आधार घेतला जाणार आहे. संयुक्त मोजणी, जमिनीचे मूल्यांकन, पोटखराब जमीन, गुणांक, १२ टक्के अतिरिक्त रक्कम, बिनशेती जमिनीचे मूल्यांकन, निवाडा, मोबदला वाटप आणि पुनर्वसन आदी बाबींचा त्यात समावेश आहे. त्यामुळे बाधित शेतकऱ्यांसाठी जमिनीचे क्षेत्र, बाजारमूल्य, लागू गुणक, पिके-झाडांचे मूल्यांकन आणि अंतिम निवाडा हे टप्पे महत्त्वाचे ठरणार असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे.

### सरकार धुळफेक करतेय : फोंडे

केंद्रीय भूसंपादन कायदा २०१३ हा संपूर्ण महामार्गासाठी न लावता केवळ भरपाईसाठी लावून सरकार धूळफेक करत आहे. याच कायद्यानुसार सार्वजनिक प्रकल्पांसाठी ८० टक्के जमीन मालकांची परवानगी आवश्यक आहे. रस्ते महामार्ग कायदा १९५५ हा ब्रिटिश राजवटीपासून प्रेरणा घेतलेला कालबा, लोकशाहीविरोधी आहे.

यामध्ये शेतकऱ्यांच्या मताला महत्त्वच नाही. सरकारने काहीही केले तरी शेतकरी महामार्ग होऊ देणार नाहीत असे शक्तिपीठ महामार्ग विरोधी संघर्ष समितीचे समन्वयक गिरीश फोंडे यांनी म्हटले आहे.

**थोडक्यात**

### कंटेनरच्या धडकेत मायलेकाचा मृत्यू

**बुलढाणा :** ज्येष्ठा गौरीचे आगमन झाले असून आज घरोघरी पूजन व महा प्रसादाचे आयोजन करण्यात आले. यापूर्वी गणरायाचे आगमन झाले असल्याने सर्वत्र पवित्र वातावरण निर्माण झाले आहे. या धामधूमीत बुलढाणा शहरानजीक झालेल्या दुर्दैवी अपघातात माय लेकाचा मृत्यू ओढावला. आज शुक्रवारी ज्येष्ठा गौरीपूजनाच्या दिवशी बुलढाणा ते धाड मार्गावरील शिवसाई नगर नजिक ही दुर्घटना घडली. जालना जिल्ह्यातील जाफ्राबाद तालुक्यातील माहोरा नजीकच्या कोलापूर येथील युवक आपल्या आईला घेऊन मोटार सायकल( एम एच २१ बी बी २८४२) ने बुलढाणा शहराकडे येत होता. कंटेनर चालक बुलढाणा येथून धाड कडे जात होता. भरधाव कंटेनरने शिवसाई नगर समोर दुचाकीला जोरदार धडक दिली.

# निठारीचा आरोपी सुरेंद्र कोलीची आत्महत्या

**वृत्तसंस्था, हरिद्वार**

निठारी हत्याकांडातील आरोपी सुरेंद्र कोलीने शुक्रवारी हरिद्वारमध्ये फाशी घेऊन आत्महत्या केली. ही घटना उत्तर हरिद्वारमधील भूपतवाला येथे घडल्याचे सांगितले जात आहे. तब्बल १९ वर्षे तुरुंगात राहिल्यानंतर नोव्हेंबर २०२५ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने शेवटच्या प्रकरणातही त्याची निर्दोष सुटका केली होती. त्यानंतर तो तुरुंगाबाहेर आला होता.



नोएडातील निठारी येथे २००५-०६ मध्ये मुले आणि महिला बेपत्ता झाल्यानंतर कोलीचे नाव समोर आले होते. २९ डिसेंबर २००६ रोजी त्याच्या कोठीमागील नाल्यात मानवी अवशेष सापडल्यानंतर देशभरात खळबळ उडाली होती. त्यानंतर सीबीआयने तपास केला आणि कोलीवर अनेक प्रकरणांमध्ये खटले चालवण्यात आले. एकेकाळी त्याला १३ प्रकरणांमध्ये मृत्युदंडाची शिक्षा सुनावण्यात आली होती. मात्र, २०२३ मध्ये अलाहाबाद उच्च न्यायालयाने १२ प्रकरणांत त्याची निर्दोष मुक्तता केली. नोव्हेंबर २०२५ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने शेवटच्या प्रकरणातही त्याला दोषमुक्त केले होते.

## आयआयटी बॉम्बेमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्याची आत्महत्या

**वृत्तसंस्था, मुंबई :** कॅम्पसमध्ये विद्यार्थ्यांचे आंदोलनपवई येथील आयआयटी मुंबईच्या कॅम्पसमध्ये एका विद्यार्थ्याने टोकाचे पाऊल उचलल्याची घटना समोर आल्यानंतर खळबळ उडाली आहे. या घटनेचे पडसाद शुक्रवारी आयआयटी परिसरात उमटले असून, संतप्त विद्यार्थ्यांनी प्रशासनाविरोधात आंदोलन केल्याची प्राथमिक माहिती आहे. त्यामुळे काही काळ कॅम्पसमध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, संबंधित विद्यार्थी बी.टेक.चा विद्यार्थी होता. परीक्षेदरम्यान तो कॉपी करताना पकडला गेल्याची चर्चा आहे. त्यानंतर त्याच्यावर शैक्षणिक कारवाई होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली होती. एका वर्षासाठी निलंबनाची कारवाई होऊ शकते, अशी माहिती त्याला देण्यात आल्याने तो घाबरला असल्याचा दावा काही विद्यार्थीकडून केला जात आहे.




संपादकीय लेखणीतून...

## जलसंभरण : रेन वॉटर हार्वेस्टिंग काळाची गरज?

जागतिक पाणी देखरेख दिन दरवर्षी १८ सप्टेंबर रोजी साजरा केला जातो. या दिवसाचा उद्देश जागतिक पातळीवर पाण्याचे व्यवस्थापन, संरक्षण आणि शाश्वत उपयोग यावर लक्ष केंद्रित करणे आहे. पाणी हे जीवनासाठी आवश्यक घटक आहे, परंतु वाढत्या लोकसंख्येमुळे आणि औद्योगिकीकरणामुळे त्याच्या गुणवत्तेवर आणि प्रमाणावर ताण येत आहे. जलप्रदूषण, अव्यवस्थित पाणी वापर आणि हवामान बदल यामुळे पाणी संकटाची समस्या अधिक तीव्र झाली आहे. त्यामुळे पाण्याचे शाश्वत व्यवस्थापन करणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. पाणी देखरेख दिवस लोकांमध्ये पाणी संरक्षणाबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम, चर्चासत्रे, कार्यशाळा आणि पाण्याच्या गुणवत्तेवर लक्ष केंद्रित करणारे कार्यक्रम आयोजित केले जातात. जागतिक पाणी देखरेख दिन आपल्याला पाण्याच्या महत्त्वाची जाणीव करून देतो आणि त्याच्या योग्य व्यवस्थापनासाठी सक्रिय सहभागाची गरज लक्षात आणतो. पाण्याचे महत्त्व फक्त दहा ओळीतः १) पाणी मानवी शरीराचा मुख्य भाग आहे; मानवी शरीरात सुमारे ६० % पाणी असते. २) पिण्यासाठी आणि शरीर निरोगी ठेवण्यासाठी शुद्ध पाण्याची गरज असते. ३) स्वयंपाक करणे, आंघोळ करणे आणि स्वच्छता राखण्यासाठी पाणी वापरले जाते. ४) वनस्पतींना वाढण्यासाठी आणि अन्न तयार करण्यासाठी प्रकाश संश्लेषणांत पाण्याची आवश्यकता असते. ५) शेतीसाठी पाणी अपरिहार्य आहे, ज्यामुळे आपल्याला अन्नधान्य मिळते. ६) जलचर प्राण्यांचे आणि वनस्पतींचे संपूर्ण जीवन पाण्यावरच अवलंबून असते. ७) पाण्याचा वापर करून जलविद्युत निर्माण केली जाते. ८) शरीराचे तापमान नियंत्रित ठेवण्यास आणि पचनक्रिया सुधारण्यास पाणी मदत करते. ९) पृथ्वीचा सुमारे ७१ % भाग पाण्याने व्यापलेला आहे, पण पिण्यायोग्य गोड्या पाण्याचे प्रमाण खूप कमी आहे. १०) पाण्याचा अपव्यय टाळणे आणि पाण्याचे जतन करणे, ही काळाची गरज आहे.

पाणी देखरेख आणि जलव्यवस्थापन म्हणजे उपलब्ध जलस्त्रोतांचे संरक्षण, संवर्धन आणि गुणवत्ता तपासणी करणे होय. पाण्याचे महत्त्व आणि देखरेखपाणी गुणवत्ता तपासणीः पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता तपासण्यासाठी जिल्हा परिषद पालघर सारख्या यंत्रणा पाणी गुणवत्ता देखरेख आणि सर्वेक्षण कार्यक्रम राबवतात. जागतिक जल देखरेख दिनः दरवर्षी १८ सप्टेंबर रोजी जागतिक जल देखरेख दिन साजरा केला जातो, ज्याचा उद्देश लोकांमध्ये पाण्याच्या बचतीविषयी आणि स्त्रोतांच्या निरीक्षणाविषयी जनजागृती करणे हा आहे. जलसंधारणः पाण्याचा योग्य वापर आणि व्यवस्थापन राखण्यासाठी विकिपीडिया जलसंधारण माहिती पेजला भेट द्या. पाण्याचे नियोजन व उपाय- पाण्याची बचतः नळांची गळती रोखणे आणि दैनंदिन वापरात काटकसर करणे.पाऊस पाणी साठवणूकः रेन वॉटर हार्वेस्टिंगद्वारे पावसाचे पाणी गोळा करणे. प्रदूषण नियंत्रणः जलस्त्रोतांमध्ये दूषित पाणी व कचरा जाऊ न देणे. रेन वॉटर हार्वेस्टिंग- पावसाचे पाणी साठवण किंवा जलसंभरण म्हणजे पावसाचे वाहून जाणारे पाणी गोळा करून, विविध कारणांसाठी साठवून ठेवणे किंवा जमिनीमध्ये जिरवून भूजल पातळी वाढवणे होय. मुख्य घटक व पद्धतीः कॅचमेंट एरिया- पाणलोट क्षेत्र- ज्या पृष्ठभागावर पाऊस पडतो, जसे की घराचे छप्पर किंवा खुली जमीन.वाहतूक प्रणालीः छतावरील पाणी पाईप्सच्या सहाय्याने खाली आणणे. फिल्टरेशन- शुद्धीकरणः कचरा व मातीवेगळी करण्यासाठी गाळण्याची यंत्रणा. साठवण किंवा पुनर्भरणः पाणी मोठ्या टाकीत साठवणे किंवा खड्डा/बोअरवेलद्वारे जमिनीत जिरवणे. पाण्याची टंचाई दूर होण्यास मदत होते. भूगर्भातील पाण्याची पातळी वाढते. शेती, बागकाम आणि घरगुती कामांसाठी पाण्याचा वापर करता येतो.

जलसंधारण म्हणजे उपलब्ध जलसंपत्तीचे संरक्षण, संवर्धन व विकास आणि तिचे उपयुक्ततापूर्ण व फायदेशीर व्यवस्थापन होय. जलसंधारणाची गरज ओळखून जलसंधारणाचे जनक सुधाकरराव नाईक यांनी पहिल्यांदाच जलसंधारण विभागाची निर्मिती केली. पृथ्वीच्या पृष्ठाचा ७१ टक्क्यांपेक्षा अधिक भाग पाण्याने व्यापलेला आहे. पाण्याच्या भौतिक व रासायनिक गुणधर्मांमुळे प्राणिजीवन, वनस्पतिजीवन, मानवी जीवन आणि आधुनिक संस्कृती यांत पाण्याला अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. महाराष्ट्रातील बहुतांश शेती ही पावसाच्या पाण्यावर अवलंबून- पर्जन्यधारित म्हणजेच कोरडवाहू आहे. महाराष्ट्र राज्यात जलसंधारण क्षेत्रातील क्रांतिकारी योगदानाबद्दल जलसंधारणाचे जनक सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त २१ ऑगस्ट रोजी जलसंधारण दिन म्हणून साजरा केला जातो.

# शिवसेना पक्ष आणि चिन्ह प्रकरणः शिंदे गटाचा युक्तिवाद आणि सुप्रीम कोर्टाचे कायदेशीर प्रश्न

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

सर्वोच्च न्यायालयात शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हाच्या मालकीवरून सुरू असलेल्या कायदेशीर आणि राजकीय महासंग्रामाने आता एक अत्यंत निर्णायक आणि गुंतागुंतीचा टप्पा गाठला आहे. देशाच्या लोकशाही प्रक्रियेवर आणि राजकीय भवितव्यावर दूरगामी परिणाम करू शकणाऱ्या या खटल्याची सुनावणी न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठासमोर सुरू असून, या प्रक्रियेत निवडणूक आयोगाच्या निर्णय प्रक्रियेवर तसेच एकनाथ शिंदे गटाच्या मुख्य दाव्यांवर मोठे कायदेशीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

सलग तीन दिवस चाललेल्या या सुनावणीत एकनाथ शिंदे गटाकडून जोरदार युक्तिवाद करण्यात आला, ज्यामध्ये त्यांच्या वकिलांनी आपला कायदेशीर बचाव प्रामुख्याने विधीमंडळातील आमदारांचे आणि खासदारांचे संख्याबळ या एकाच भक्कम वाटणाऱ्या मुद्द्यावर केंद्रित केला होता. निवडणूक आयोगाने केवळ विधीमंडळ पक्षाच्या चाचणीवर अवलंबून राहून शिंदे गटाला मूळ पक्ष आणि चिन्ह देण्याचा घेतलेला निर्णय पूर्णपणे कायदेशीर आणि संविधानाच्या चौकटीत असल्याचे सांगत वकिलांनी सादिक अली आणि सुभाष देसाई यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या जुन्या प्रकरणांचा संदर्भ दिला. तसेच, आमदारांच्या अपात्रतेच्या प्रलंबित प्रकरणाचा पक्ष आणि चिन्हाच्या वादाशी कोणताही थेट कायदेशीर संबंध नसल्याचे न्यायालयात अत्यंत ठामपणे नमूद केले. भारतीय निवडणूक आयोग ही संविधानाने स्थापन केलेली एक स्वायत्त संस्था असल्याने त्यांना स्वतःचे विशेषाधिकार वापरून तत्कालीन राजकीय परिस्थितीचे आकलन करण्याचा आणि अंतिम निर्णय घेण्याचा पूर्ण हक्क आहे, यावर शिंदे गटाने आपल्या युक्तिवादात विशेष भर दिला होता.

मात्र, शिंदे गटाचा हा युक्तिवाद अतिशय आत्मविश्वासाने सुरू असतानाच न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांनी विचारलेल्या एका अत्यंत अणकुचीदार, अनपेक्षित आणि रोखठोक प्रश्नाने या संपूर्ण खटल्याला एक मोठी कलाटणी दिली. जेव्हा शिंदे गटाच्या वकिलांनी न्यायालयात असे सांगितले की, पक्षाची मूळ घटना आणि पक्षसंघटना तपासण्यात निवडणूक आयोगाला अनेक व्यावहारिक अडचणी होत्या, त्यामुळे विधीमंडळ पक्षातील बहुमत हा एकमेव व्यवहार्य आणि सोपा पर्याय आयोगाने स्वीकारला; तेव्हा न्यायमूर्तींनी त्यांना जागेवरच थांबवले. जर आयोगासमोर या तिन्ही निकषांना मर्यादा होत्या आणि परिस्थिती अत्यंत गुंतागुंतीची होती, तर निवडणूक आयोगाकडे आणखी एक अत्यंत महत्त्वाचा पर्याय उपलब्ध होता, तो म्हणजे राखीव चिन्हाचा लाभ कोणत्याही एका गटाला घाईघाईने देण्याची काहीच गरज नव्हती. अशा परिस्थितीत दोन्ही गटांना वेगवेगळी आणि नवीन चिन्हे देऊन बाळासाहेब ठाकरेंच्या पुण्याईवर नव्हे, तर स्वतःच्या राजकीय ताकदीवर मैदानात लढा, असे स्पष्ट निर्देश आयोगाने का दिले नाहीत, असा सणसणीत आणि विचार करायला लावणारा सवाल न्यायमूर्तींनी थेट विचारला.

सर्वोच्च न्यायालयाच्या या अनपेक्षित प्रश्नावर शिंदे गटाचे वकील पुरते गडबडले आणि त्यांना तात्काळ कोणतेही समाधानकारक, तर्कशुद्ध कायदेशीर उत्तर देता आले नाही. अखेर, आपण आपल्या पुढील युक्तिवादात यावर सविस्तर उत्तर देण्याचा नक्की प्रयत्न करू, अन्यथा आपला युक्तिवाद या मुद्द्यावर अपयशी ठरला असे खुशाल माना, अशी हतबलता व्यक्त करत वकिलांनी एका अर्थाने देशाच्या सर्वोच्च न्यायालयात आपला अंशतः पराभवच मान्य केला.

भारतीय लोकशाहीत आणि निवडणूक प्रक्रियेत कोणत्याही राजकीय पक्षात जेव्हा उभी फूट पडते आणि मूळ पक्ष कोणाचा असा पेचप्रसंग निर्माण होतो, तेव्हा तो सोडवण्यासाठी निवडणूक आयोगाकडे प्रामुख्याने तीन स्थापित निकष असतात. यामध्ये पक्षाची मूळ घटना आणि उद्दिष्टे, पक्ष संघटनेतील पदाधिकाऱ्यांचे बहुमत आणि शेवटी विधीमंडळातील लोकप्रतिनिधींचे बहुमत यांचा समावेश असतो. जेव्हा दोन्ही गटांकडून पक्षावर अत्यंत प्रबळ आणि कायदेशीर




दावे केले जातात आणि संघटनात्मक चाचणीत मोठी गुंतागुंत असते, तेव्हा आयोगाने कोणावरही अन्याय होऊ न देता मूळ चिन्ह तात्पुरते गोठवण्याचा तटस्थ पर्याय निवडणे अपेक्षित असते. मात्र, निवडणूक आयोगाने उपलब्ध असलेला हा सर्वांत सुरक्षित आणि न्याय्य पर्याय का नाकारला, याची कोणतीही सबळ कायदेशीर किंवा तर्कशुद्ध मांडणी शिंदे गटाला सर्वोच्च न्यायालयात आतापर्यंत करता आलेली नाही. या संपूर्ण घटनाक्रमातून असाच एक गंभीर निष्कर्ष निघतो की, शिंदे गटाचे वकील केवळ स्वतःच्या अशिलाची बाजू मांडण्याऐवजी निवडणूक आयोगाच्या एकांगी आणि सदोष निर्णय प्रक्रियेचीच बचाव करण्याची केविलवाणी धडपड करत आहेत. परिणामी, निवडणूक आयोगाने कोणत्याही राजकीय दबावाखाली काम करून मूळ चिन्ह गोठवण्याऐवजी ते एका विशिष्ट गटाच्या पदरात टाकले, हा आरोप आता केवळ राजकीय वर्तुळातच नव्हे तर कायदेशीर पातळीवरही अधिक गडद झाला आहे.

या महत्त्वपूर्ण सुनावणीदरम्यान सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालील तत्कालीन घटनापीठाने दिलेल्या ऐतिहासिक निकालाचीही अतिशय प्रकर्षाने आठवण करून देण्यात आली. अपात्रतेचा निर्णय प्रलंबित असताना निवडणूक आयोगाने घाईघाईने निर्णय का घ्यावा, यावर तत्कालीन न्यायालयाने ताशेरे ओढले होते. कारण, कोणतेही निवडणूक चिन्ह आणि मूळ राजकीय पक्ष हे केवळ विधीमंडळ पक्षाची म्हणजे निवडून आलेल्या मोजक्या आमदारांची वैयक्तिक मक्तेदारी असू शकत नाही, तर ती मूळ राजकीय पक्षाची आणि तळागाळातील लाखो कार्यकर्त्यांच्या संघटनेची संपत्ती असते. हा अत्यंत मूलभूत आणि लोकशाहीचा कणा मानला जाणारा कायदेशीर मुद्दा न्यायालयाच्या विचारणेतून पुन्हा एकदा नव्याने समोर आला आहे. यामुळे निवडणूक आयोगाने केवळ लोकप्रतिनिधींच्या डोक्यांची मोजणी करून एका रात्रीत पक्षाची मालकी बहाल करणे कितपत योग्य आहे, हा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या या थेट प्रश्नांमुळे आणि सुरू असलेल्या अत्यंत सूक्ष्म कायदेशीर तपासणीमुळे आता आगामी सुनावणी अत्यंत उत्कंठावर्धक आणि निर्णायक ठरणार आहे.

आता एकनाथ शिंदे गटाला हे सविस्तरपणे आणि पुराव्यांसह सिद्ध करावे लागेल की निवडणूक आयोगाने संघटनात्मक बहुमतासारख्या इतर सर्व महत्त्वाच्या पर्यायांकडे आणि चिन्ह गोठवण्याच्या उपलब्ध पर्यायाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून केवळ विधीमंडळ चाचणीचाच आधार घेणे कसे कायदेशीररीत्या योग्य होते. सर्वोच्च न्यायालयाच्या या भूमिकेमुळे आणि न्यायमूर्तींच्या स्पष्ट विचारणेमुळे उद्धव ठाकरे गटाच्या संघटनात्मक बहुमताच्या दाव्याला न्यायालयात पुन्हा एकदा अनपेक्षितपणे मोठे बळ मिळाले आहे. लोकशाहीत संघटना ही आमदारांपेक्षा मोठी असते हे सूत्र जर न्यायालयाने ग्राह्य धरले, तर आगामी काळात शिंदे गटासाठी हा कायदेशीर लढा अत्यंत खडतर होईल. जर शिंदे गटाला सर्वोच्च न्यायालयात मूळ पक्ष आपलाच आहे हे घटनात्मक आणि संघटनात्मकदृष्ट्या सिद्ध करता आले नाही, तर केवळ आमदारांच्या बहुमताच्या आधारावर संपूर्ण पक्ष ताब्यात घेण्याचा त्यांचा प्रयत्न पूर्णपणे फोल ठरू शकतो, आणि अशा परिस्थितीत त्यांचे राजकीय अस्तित्व व त्यांना मिळालेले निवडणूक चिन्ह या दोन्ही गोष्टी एकाच वेळी मोठ्या धोक्यात येऊ शकतात.

- ९५६१५९४३०६

## लोकजागृतीचे साधक व राष्ट्रीय एकतेचे प्रतीक : "गणेशोत्सव"

आपला भारत देश विविधतेने नटला आहे. भारतात अनेक जाती धर्माचे लोक सर्वधर्मसम भावाने, गुण्यागोविंदाने राहतात. भारतात अनेक सणवार, उत्सव मोठ्या आनंदाने साजरे केले जातात. त्यातील एक महत्वपूर्ण सण वा उत्सव म्हणजे "गणेशोत्सव". गणेशोत्सव संपूर्ण भारतात मोठ्या आनंदाने, उत्साहाने, विश्वासाने, भक्तिभावाने, श्रद्धेने साजरा केला जातो. संतांची भूमी म्हणून ओळखला जाणारा आपला महाराष्ट्र. संतांच्या चांगल्या विचारांनी, पावन पदकमलांनी पावन झालेली आपल्या महाराष्ट्राची पावन भूमी. आपल्या महाराष्ट्राच्या पावन भू वर गणेशोत्सव पवित्र भावनेने साजरा करतात.

गणेश चतुर्थी ही भाद्रपद महिन्यात शुक्ल पक्षात येते. आणि १० दिवसानंतर अनंत चतुर्दशीला संपते. १० दिवसांचा हा सण, उत्सव मोठ्या थाटामाटात चालतो. बुद्धी, समृद्धी, संकटनाशक, संकट निवारण, सुखकर्ता, दुःखहर्ता, सुखाःचा दाता, दुःख, संकटं दूर करणारे आपले आवडते दैवत श्री गणरायांना, लाडक्या गणपती बाप्पाला हा उत्सव समर्पित आहे. या १० दिवसाच्या गणेशोत्सवाच्या काळात गणपती मूतीर्ची स्थापना, विविध धार्मिक, सामाजिक कार्यक्रम, भजन, कीर्तन, व्याख्याने, स्वच्छता अभियान, रक्तदान, सेवादान, अन्नदान, मोफत आरोग्य तपासणी शिबीरे, गोर-गरीब, गरजवंतांना आवश्यक वस्तू वाटप केले जातात. अशा प्रकारचे विविध कार्यक्रम घेतले जातात.

**गणेशोत्सवाची सुरुवात :** महाराष्ट्रात पेशव्यांच्या काळात गणेशोत्सवाची सुरुवात झाली. आणि पुढे १८९३ साली राष्ट्रीय एकात्मतेसाठी व जनहितार्थतेसाठी स्वातंत्र्यसैनिक लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाला समता, समानता, बंधुत्वाचे व राष्ट्रीय एकतेचे सार्वजनिक रूप देत गणेशोत्सवाची मुहूर्तमेढ रोवली. तसेच आपल्या बांधवांना संघटित करून राष्ट्रीय अस्मिता व राष्ट्र प्रेमभावना जागृत करावी व देशाभिमान जागृत व्हावा. या उद्देशाने गणेशोत्सवाची सुरुवात केली. गणेशोत्सवामुळे सामाजिक, धार्मिक निती मूल्ये जोपासता आली. त्या काळात गणेशोत्सवामुळे समाजातील ऐक्य, सलोखा टिकून राहण्यास मदत झाली. व लोक एकजूटतेने राहू लागले. समाजातील सर्व स्तरातील लोक एकत्र येऊन गणेशोत्सव साजरा करू लागले.

आपण ज्या समाजात राहतो त्या समाजाचे आपण कांही देणे लागतो. आणि ते देणे म्हणजे एकमेकांप्रति आदर, सम्मान, प्रेम भावना, आपुलकी, आपलेपणा, जातीय सलोखा. समाजातील परस्परातील मतभेद, द्वेष, मत्सर, ईर्षा या विद्रोही भावना किंवा तिरस्कार निर्माण करणाऱ्या गोष्टी समूळ नष्ट करण्यासाठी गणेशोत्सव हा सलोखा राखणारा ऐक्याचा सण आपला वारसा बांधिलकीने आजतागायत आतापर्यंत जपून आहे. लोकजागृतीचे माध्यम म्हणजेच गणेशोत्सव. लोकांमध्ये देश प्रेम भावना, ऐकतेची सदभावना जागृत करून एकमेकांना सलोखा राखत जवळ आणणे. गणेशोत्सव हा केवळ एक सण किंवा उत्सव नाही. हा सलोखा व एकतेचा उत्सव आहे.

**- मनीषा सोन्नेकर/सोनकांबळे**
**९९६००२८८९९**
**देगलूर. जि. नांदेड**

# अभिषेकच्या वादळात अफगाणिस्तान भुईसपाट

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

गुरुवारी येथे झालेल्या तिसऱ्या आणि अंतिम टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात सलामीवीर अभिषेक शर्माने अफगाणिस्तानच्या गोलंदाजीवर हल्ला चढवत ३० चेंडूंत शतक झळकावले, ज्यामुळे भारताला १२७ धावांनी विजय मिळवून ३-० ने मालिका जिंकण्यास मदत झाली. अभिषेकने ३४ चेंडूंत १०८ धावांची खेळी केली, ज्यात ११ षटकार आणि नऊ चौकारांचा समावेश होता. टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील हे त्याचे तिसरे शतक होते. केवळ ३० चेंडूंत शतक झळकावून, तो या फॉरमॅटमध्ये सर्वात जलद शतक करणारा भारतीय क्रिकेटपटू ठरला. यामुळे भारताला सात गडी गमावून २२१ धावांचा डोंगर उभा करण्यास मदत झाली.

अभिषेकचे बहुतेक जोरदार फटके गोलंदाजांच्या डोक्यावरून सीमारेषेच्या पलीकडे गेले. त्याचे शतक हे एका कसोटी खेळणाऱ्या देशाच्या फलंदाजाने दुसऱ्या कसोटी खेळणाऱ्या देशाविरुद्ध केलेले सर्वात जलद शतक देखील आहे. त्याने या वर्षाच्या सुरुवातीला दक्षिण आफ्रिकेविरुद्ध न्यूझीलंडच्या फिन ॲलनने ३३ चेंडूंत केलेले शतक मोडले होते. या लक्ष्याचा पाठलाग करताना, अफगाणिस्तानचा संघ १४.१ षटकांत ९४ धावांवर सर्वबाद झाला. या मालिकेत अफगाणिस्तानची फलंदाजी आणि गोलंदाजी दोन्ही निराशाजनक ठरल्या आहेत. आता दोन्ही संघ आशियाई खेळांसाठी रवाना होतील.

अफगाणिस्तानच्या डावातील पहिले षटक भारताने अष्टपैलू नितीश कुमार रेड्डीला दिले. त्याने १५ धावा दिल्या, पण नंतर सावरत तीन बळी घेतले. अक्षर पटेलने चौथ्या षटकात रहमानुल्ला गुरबाज (१५ धावा) आणि सेदिकुल्ला अटल यांना बाद करून अफगाणिस्तानला सुरुवातीलाच धक्का दिला. पाचव्या षटकात जसप्रीत बुमराहने यॉर्कर टाकून दरविश रसूलीचच्या यष्टया उखडल्या. पुढच्याच षटकात यश ठाकूरने कर्णधार इब्राहिम झद्रानला (२५ धावा) बाद केले, त्यामुळे पॉवरप्लेमध्ये अफगाणिस्तानची धावसंख्या ४७ धावांवर चार गडी बाद अशी झाली. त्यानंतर संघाने ठराविक अंतराने विकेट गमावल्या.

रवी बिश्नोईनेही तीन बळी घेतले. भारताने मालिका आधीच जिंकलेली असताना, अभिषेकच्या आक्रमक फलंदाजीने या औपचारिक सामन्यात उत्साह वाढवला. या मालिकेत पहिल्यांदाच भारताने प्रथम फलंदाजी करत अभिषेकला खेळपट्टीवर पूर्ण वेळ दिला. त्याच्या षटकारांच्या वर्षावामुळे भारताने पॉवरप्लेमध्ये एकही गडी न गमावता १०० धावा पूर्ण केल्या, जी टी-२० क्रिकेटमधील पहिल्या सहा षटकांतील भारताची सर्वोच्च धावसंख्या आहे. अभिषेकच्या आक्रमक फलंदाजीमुळे संजू सॅमसनला (५० धावा) पॉवरप्लेमध्ये फारशी संधी मिळाली नाही, पण त्याने ३५ चेंडूंमध्ये शानदार अर्धशतक झळकावले. ५० पेक्षा जास्त धावांची ही त्याची सलग दुसरी खेळी आहे. दोन्ही सलामीवीर उत्कृष्ट फॉर्ममध्ये असल्याने, वैभव सूर्यवंशीला भविष्यात बेंचवरच बसावे लागू शकते.




अभिषेकने सुरुवातीपासूनच आक्रमक पवित्रा कायम ठेवत वेगवान गोलंदाज आणि फिरकी गोलंदाज या दोघांविरुद्धही तितक्याच चांगल्या धावा केल्या. भारतीय खेळपट्टूयांवर सातत्याने संघर्ष करणाऱ्या अफगाणिस्तानसमोर अभिषेकला रोखण्याचे आव्हान होते. अभिषेकने अझमतुल्ला उमरझाई आणि फजलहक फारुकी यांच्याविरुद्ध मोठी धावसंख्या उभारली. उमरझाईच्या दुसऱ्या षटकात १७ धावा आणि फारुकीच्या तिसऱ्या षटकात २३ धावा झाल्या. कर्णधार इब्राहिम झद्रानने पॉवरप्लेमध्येच फिरकी गोलंदाजीचा प्रयत्न केला, पण त्याचा काही उपयोग झाला नाही. अभिषेकचे वादळ अव्याहतपणे सुरूच होते.

सॅमसनने मोहम्मद नबीच्या गोलंदाजीवर सलग दोन षटकार ठोकले. त्याच षटकात अभिषेकनेही दोन षटकार मारून धावसंख्या २९ धावांवर नेली. २२ धावांवर असलेल्या सॅमसनला मिड-ऑफला जीवदान मिळाले, कारण झद्रान त्याचा झेल घेऊ शकला नाही. अशाप्रकारे, अभिषेकने १६ चेंडूंमध्ये आपले अर्धशतक पूर्ण केले आणि नवव्या षटकात शतक पूर्ण केले. त्याने अब्दुल्ला अहमदझाईच्या गोलंदाजीवर एका शानदार पुल शॉटने ९९ धावा पूर्ण केल्या, त्यानंतर एक धाव घेत शतकी टप्पा गाठला. शतक पूर्ण केल्यानंतर, अभिषेकने ध्यानस्थ मुद्रेत बसून आनंद साजरा केला. या विशेष खेळीला दाद देण्यासाठी प्रेक्षकही उभे राहिले. तथापि, अफगाणिस्तानने अखेरीस भारताला २५० धावांच्या आत रोखण्यात यश मिळवले. भारताने शेवटच्या पाच षटकांत चार गडी गमावले आणि केवळ ३७ धावा केल्या.

या मालिकेसाठी संजू सॅमसनला पुन्हा एकदा संघात स्थान देण्यात आले होते आणि त्याने या संधीचे सोने केले. आपल्या शानदार फलंदाजीच्या जोरावर सॅमसनने ९,००० धावा पूर्ण केल्या. भारतीय डावाच्या पाचव्या षटकातील तिसऱ्या चेंडूवर त्याने हा टप्पा गाठला. हा पराक्रम करण्यासाठी त्याला २३ धावांची गरज होती. संजू सॅमसनने आपल्या ३५१ व्या टी-२० आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील ३३४ व्या डावात ९,००० धावा पूर्ण केल्या.

### संजूचे सलग दुसरे अर्धशतक

भारतीय यष्टीरक्षक-फलंदाज संजू सॅमसनने सामन्यात उत्कृष्ट कामगिरी केली. त्याने ३५ चेंडूंमध्ये दोन चौकार आणि चार षटकारांसह ५० धावा केल्या. हे सॅमसनचे सलग दुसरे अर्धशतक होते. अफगाणिस्तानविरुद्धच्या तिसऱ्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्याच्या १२.४ व्या षटकात एक धाव घेत सॅमसनने आपले अर्धशतक पूर्ण केले. तो १३.१ व्या षटकात अझमतुल्ला उमरझाईच्या गोलंदाजीवर बाद झाला.

### अफगाणिस्तानविरुद्धचा टी२० सामना भारतीय संघासाठी सलामीच्या जागांची शर्यत सोपी करेल की अधिक कठीण?

इतकंच नाही, तर संजू सॅमसनने जागतिक क्रिकेटमधील त्या ३५ खेळाडूंमध्ये स्थान मिळवले आहे, ज्यांनी टी२० फॉरमॅटमध्ये ९,००० धावांचा टप्पा ओलांडला आहे. या कामगिरीवरून हे दिसून येते की, संजूची फलंदाजी जागतिक स्तरावरही सातत्याने प्रभावी ठरली आहे.

### संजू सॅमसनची नवीन टी२० क्रिकेट कामगिरी

संजू सॅमसन आता टी२० क्रिकेटमधील भारताच्या सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांमध्ये पाचव्या स्थानावर पोहोचला आहे. त्याच्या नावावर ९,०२७ धावा आहेत. या यादीत विराट कोहली १४,२१८ धावांसह अव्वल स्थानी आहे. रोहित शर्मा १२,५३१ धावांसह दुसऱ्या, शिखर धवन ९,७९७ धावांसह तिसऱ्या आणि सूर्यकुमार यादव ९,७२९ धावांसह चौथ्या स्थानावर आहे.

### ईशान किशन अव्वल स्थानी, अभिषेकने हमजा खानला मागे टाकले

ईशान किशनने अफगाणिस्तानविरुद्ध केवळ १० धावा करूनही २०२६ मधील आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील सर्वाधिक धावा करणारा फलंदाज बनण्याचा मान मिळवला. ईशान किशनने यावर्षी आतापर्यंत २९ सामन्यांमध्ये ९०२ धावा केल्या आहेत, तर २४ सामन्यांमध्ये ८९५ धावा करणारा करणबीर सिंग दुसऱ्या स्थानावर घसरला आहे. २६ सामन्यांमध्ये ७४३ धावा करणारा अभिषेक शर्मा आता या यादीत तिसऱ्या स्थानावर पोहोचला आहे.

यापूर्वी तिसऱ्या स्थानावर असलेला हमजा खान आता २०२६ मधील सर्वाधिक धावा करणाऱ्यांच्या यादीत चौथ्या स्थानावर पोहोचला आहे. हमजा खानने आतापर्यंत २१ सामन्यांमध्ये ६८२ धावा केल्या आहेत. हॅरी ब्रूक १८ सामन्यांमध्ये ६५७ धावांसह पाचव्या स्थानावर आहे. शिमरॉन हेटमायर आता १६ सामन्यांमध्ये ५६६ धावांसह सहाव्या स्थानावर पोहोचला आहे.

- ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

दैनिक सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार
दुसरे मुखपृष्ठ
Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : शनिवार, १९ सप्टेंबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com

# ५ ऑक्टोबरनंतर दुष्काळी परिस्थितीवर निर्णय घेऊ

**मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले स्पष्ट**

**वृत्तसंस्था, मुंबई**

राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहीले अपुऱ्या पावसामुळे जी गंभीर परिस्थिती निर्माण झाली त्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांकडे शरद पवारांनी या पत्रातून लक्ष वेधले असून मुख्यमंत्र्यांकडे तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली. शरदद पवारांच्या या पत्राची राजकीय वतुर्ळात चर्चा सुरू असतानाच मुख्यमंत्री फडणवीस यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली आहे. दुष्काळ आणि नैसर्गिक आपत्तीग्रस्तांना मदत करण्यासंदर्भात राज्य सरकारने यापूर्वीच निर्णय घेतले असून मंत्रिमंडळाच्या बैठकीत दुष्काळी परिस्थिती आणि शेतकऱ्यांना मदत करण्याबाबत सविस्तर चर्चा झाल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

शेतकऱ्यांसाठी कर्जमाफीची योजना आधीपासूनच सुरू असून दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी आवश्यक उपाययोजनाही राज्य सरकारकडून करण्यात येणार आहेत. ५ ऑक्टोबरनंतर करण्यात येणाऱ्या पंचनाम्यांच्या आधारे केंद्र सरकारकडे एनडीआरएफअंतर्गत मदतीची मागणी केली जाणार आहे. मात्र, एनडीआरएफ या मदतीची वाट न पाहता राज्य सरकारच्या निधीतून आपण राज्य सरकारच्या वतीने मदत करणार आहोत, त्याची आतापासूनच तयारी सुरू केली आहे असे त्यांनी नमूद केले. एनडीआरएफकडून मदत मिळेपर्यंत शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी राज्य सरकार स्वतःच्या निधीतून खर्च करणार असून, त्यानंतर केंद्राकडून मिळणाऱ्या एनडीआरएफच्या निधीतून हा खर्च भरून काढला जाणार असल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

**शेतकऱ्यांना थेट मदत**

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना थेट आर्थिक मदत देण्यासोबतच पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि आवश्यक त्या ठिकाणी चाऱ्याची गरज असेल, ते सगळे उपलब्ध करून देण्याचे नियोजन केले आहे. सध्याची दुष्काळाची जी परिस्थिती आहे, ती राज्य सरकारने गांभीर्याने घेतली असून त्यावर आवश्यक त्या उपाययोजना सुरू असल्याचंही त्यांनी सांगितले.



**शरद पवारांच्या पत्रावर मांडली भूमिका**

शरद पवार साहेब हे ज्येष्ठ नेते आहे, त्यांनी पत्र पाठवून काही सूचना केल्या, ही चांगली गोष्ट आहे. मात्र त्याला मी कुठलही राजकीय रंग अथवा वळण देणार नाही. याबाबत सरकारने आवश्यक त्या उपाययोजना सुरू केल्या आहेत असे फडणवीस यांनू नमूद केले. एवढेच नव्हे तर यापुढे त्यांनी आणखी काही सूचना किंवा सल्ले दिले, तर ते निश्चितपणे ऐकू, अशी भूमिका फडणवीस यांनी मांडली.

## दहावी, बारावीच्या परीक्षेचे वेळापत्रक जाहीर



**वृत्तसंस्था, मुंबई**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२७ मध्ये घेण्यात येणाऱ्या इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. राज्यातील पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत या परीक्षा घेण्यात येणार आहेत. बारावीची लेखी परीक्षा ८ फेब्रुवारी ते १६ मार्च या कालावधीत, तर दहावीची लेखी परीक्षा १५ फेब्रुवारी ते ११ मार्च या कालावधीत होणार असल्याची माहिती आहे. सविस्तर वेळापत्रक नंतर जाहीर होणार असून या तारखांमुळे विद्यार्थ्यांना परीक्षेच्या तयारीसाठी व्यवस्थित नियोजन करता येणार आहे.

राज्य मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत या परीक्षा घेतल्या जाणार आहेत. इयत्ता बारावीच्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (एचएससी) आणि दहावीच्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (एसएससी) परीक्षांचे वेळापत्रक मंडळाने जाहीर केले आहे. बारावीच्या विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा ही सोमवार, ८ फेब्रुवारी २०२७ पासून सुरू होणार असून मंगळवार, १६ मार्चपर्यंत चालणार आहे. तर दहावीच्या विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा सोमवार, १५ फेब्रुवारीपासून सुरू होऊन गुरुवार, ११ मार्च रोजी संपणार आहे.

### प्रात्यक्षिक परीक्षा कधी होणार?

लेखी परीक्षांपूर्वी बारावीच्या विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी आणि अंतर्गत मूल्यमापनाच्या परीक्षा बुधवार, २० जानेवारी ते शनिवार, ६ फेब्रुवारी २०२७ या कालावधीत होणार आहेत. दहावीच्या विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी आणि अंतर्गत मूल्यमापनाच्या परीक्षा गुरुवार, २८ जानेवारी ते शनिवार, १३ फेब्रुवारी २०२७ या कालावधीत आयोजित करण्यात येणार आहेत.

## पाकमध्ये पुन्हा लॉकडाऊनसारखे कडक निर्बंध!

**वृत्तसंस्था, इस्लामाबाद**

पश्चिम आशियात नव्याने निर्माण झालेला तणाव आणि लाल समुद्रातील अडथळ्यांमुळे इंधनटंचाईचा तडाखा पाकिस्तानला बसला आहे. इंधनाची बचत करण्यासाठी आणि अनावश्यक खर्च रोखण्यासाठी पाकिस्तान सरकारने नवीन कडक नियमावली जारी केली आहे. यामध्ये सरकारी वाहनांच्या खरेदीवर पूर्ण बंदी, अधिकृत वाहनांच्या इंधन वाटपात ५० टक्के कपात आणि लग्नात फक्त एकच पदार्थ वाढण्याचा निर्बंध घालण्यात आले आहेत. मार्चमध्ये अमेरिका-इराण युद्ध सुरू झाल्यानंतर पाकिस्तानने अशाच प्रकारचे काटकसरीचे उपाय जाहीर केले होते. त्या वेळी पाकिस्तानने दोन आठवड्यांसाठी शाळा बंद ठेवल्या होत्या, सरकारी अधिकाऱ्यांचा इंधन वापर कमी केला होता आणि इंधन बचत व सरकारी खर्च कमी करण्यासाठी कर्मचाऱ्यांना वर्क फ्रॉम होम करण्यास सांगण्यात आले होते. पाकिस्तान सरकारच्या कॅबिनेट डिव्हिजनने यासंदर्भात अधिसूचना जारी केली असून हे नियम तातडीने लागू करण्यात आले आहेत. इंधन कपात आणि केंद्रीय अधिकाऱ्यांच्या परदेश प्रवासावरील बंदीसह काही निर्बंध किमान तीन महिन्यांसाठी लागू राहणार आहेत. पाकिस्तानने काही ठराविक सवलतींसह केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या परदेश प्रवासावर तीन महिन्यांचे निर्बंध घातले आहेत. जिथे परदेश प्रवास अनिवार्य असेल, तिथे मंत्री, सल्लागार आणि अधिकाऱ्यांना इकॉनॉमी क्लासनेच प्रवास करावा लागणार आहे.



**दुकाने, शॉपिंग मॉल्स ९ वाजता बंदचे आदेश**

सर्वसामान्यांवर परिणाम करणाऱ्या उपायांमध्ये पाकिस्तान सरकारने लग्न आणि त्यासंबंधित सर्व कार्यक्रमांमध्ये फक्त एकच पदार्थ वाढण्याचे निर्देश दिले आहेत, असे कराचीतील प्रसिद्ध वृत्तपत्राने म्हटले आहे. अधिसूचनेत अनेक व्यावसायिक आस्थापना बंद करण्याची वेळ आधीपेक्षा लवकर निश्चित करण्यात आली आहे. दुकाने, बाजार, शॉपिंग मॉल्स, बाजारपेठा, डिपार्टमेंटल आणि किराणा दुकाने रात्री ९ वाजेपर्यंत बंद करावी लागतील.



# सोयाबीनवर येलो मोझॅकचा घाला !

## शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावण्याची भीती

### उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता, पीक विमा कंपनीने तातडीने पंचनामे करण्याची शेतकऱ्यांची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**
पावसाने दडी मारल्याने दुबार पेरणीचे संकट झेललेल्या नरखेड तालुक्यातील शेतकऱ्यांसमोर आता सोयाबीन पिकावरील येलो मोझॅक रोगाने नवे संकट उभे केले आहे. पिकाची वाढ जोमाने होऊन शेंगा धरण्याच्या अवस्थेत असतानाच अनेक शेतांमध्ये सोयाबीनची पाने पिवळी पडून झाडे वाळू लागली आहेत. त्यामुळे उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट होण्याची शक्यता असून, शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडण्याची भीती निर्माण झाली आहे.

यंदाच्या खरीप हंगामाच्या सुरुवातीपासूनच शेतकऱ्यांच्या अडचणी कायम आहेत. पावसाने मोठा खंड दिल्याने अनेक शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागली. त्यासाठी बियाणे, खते, औषधांचा अतिरिक्त खर्च करावा लागला. उधारीवर पैसे घेऊन पेरणी केलेल्या शेतकऱ्यांना पीक हाताशी येण्याची अपेक्षा असतानाच सोयाबीनवर येलो मोझॅक रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने त्यांच्या चिंतेत भर पडली आहे.

रोगाचा प्रादुर्भाव झालेल्या शेतांमध्ये सोयाबीनची पाने पिवळसर होत असून झाडांची वाढ खुंटत आहे. अनेक ठिकाणी शेंगा धरण्यापूर्वीच झाडे वाळू लागल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे अपेक्षित उत्पादन मिळणे कठीण झाले असून, सोयाबीन हे उत्पन्नाचे प्रमुख साधन असलेल्या शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे ठाकले आहे.

यंदा मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी सोयाबीनची लागवड केली आहे. मात्र,



येलो मोझॅक रोगाच्या प्रादुर्भावामुळे पिवळे पडलेले सोयाबीन पीक.

पावसातील खंड, दुबार पेरणीचा खर्च आणि आता रोगाचा प्रादुर्भाव यामुळे उत्पादन खर्च वाढला असून उत्पन्न घटण्याची शक्यता आहे. त्यामुळे शासनाने शेतकऱ्यांच्या नुकसानीची तातडीने दखल घेऊन प्रत्यक्ष शेताची पाहणी करावी, अशी मागणी होत आहे. दरम्यान, अनेक शेतकऱ्यांनी मोठ्या खचार्तून पीक विमा काढला आहे. मात्र, नुकसान होऊनही पीक विमा कंपनीचे कर्मचारी अद्याप बांधावर पोहोचले नसल्याची तक्रार शेतकऱ्यांकडून केली जात आहे. त्यामुळे यंदाही नुकसानग्रस्त शेतकरी पीक विम्यापासून वंचित राहणार का, असा सवाल उपस्थित होत आहे.

नुकसानग्रस्त सोयाबीन क्षेत्राची तातडीने पाहणी करून पंचनामे करण्यात यावेत. पीक विमा कंपनीनेही विलंब न करता नुकसानीची नोंद घेऊन पात्र शेतकऱ्यांना विम्याची भरपाई द्यावी. तसेच शासनाने विशेष मदत जाहीर करून दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात आर्थिक मदत जमा करावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून जोर धरू लागली आहे.

सोयाबीनच्या उत्पादनावरच अनेक शेतकऱ्यांचे वर्षभराचे आर्थिक नियोजन अवलंबून असते. त्यामुळे रोगामुळे होणारे नुकसान केवळ एका पिकाचे नसून संपूर्ण कुटुंबाच्या आर्थिक नियोजनावर परिणाम करणारे आहे. शासन आणि संबंधित यंत्रणेने तातडीने उपाययोजना करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

**शेतकऱ्यांची व्यथा... दुबार पेरणीचा खर्च केला, आता पीकही हातातून जाण्याची भीती**

पावसाअभावी यावर्षी दुबार पेरणी करावी लागली. त्यात बियाणे, खते व औषधांवर मोठा खर्च झाला. आता सोयाबीन पिकावर येलो मोझॅक रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने पीक वाळू लागले आहे. त्यामुळे शासनाने तातडीने पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी.

**- राहुल झरकर, शेतकरी, मदना**

---

**पीक विम्याची भरपाई मिळणार तरी कधी ?**

दरवर्षी सोयाबीन पिकावर विविध रोगांचा प्रादुर्भाव होतो. मोठ्या प्रमाणात खर्च करून शेतकरी पीक विमा काढतात. मात्र, मागील वषीर्ही अनेक शेतकऱ्यांना पीक विम्याचा लाभ मिळाला नाही. यावर्षी तरी पीक विमा कंपनीने तातडीने शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानीचे पंचनामे करून पात्र शेतकऱ्यांना विम्याची भरपाई द्यावी.

**- राजेश खेडकर, शेतकरी, जलालखेडा**

## रिध्दी चिखले हिचा पंजाबराव देशमुख मेडीकल कॉलेज, अमरावती येथे एम.बी.बी.एस.ला प्रवेश

### चिखले परिवारात सहावी डॉक्टर होणार रिध्दी

**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**
काटोल तालुक्यातील मेंढेपठार (बाजार) येथील रहिवासी असलेली कु.रिध्दी विजय चिखले ही के.जॉन पब्लिक स्कुल,



सावनेर या शाळेत दहाव्या वर्गातून अव्वल स्थानी आली होती. तिला सी.बी.एस.सी.बोर्डाच्या निकालात ९६.८०% गुण प्राप्त झाले होते. १२ वी ला ८९ % गुण प्राप्त झाले होत. प्रथम नीट परिक्षेतील पेपर फुटीमुळे परत परिक्षा द्यावी लागली. या परिक्षेत तिने ५१८ गुण मिळवुन नुकताच पंजाबराव देशमुख वैद्यकिय महाविद्यालय, अमरावती येथे एम.बी.बी.एस. ला प्रवेश घेतला असुन तिचे सर्वत्र कौतुक होत आहे. ती नागपुर जिल्हा परिषदचे माजीउपाध्यक्ष चंद्रशेखर चिखले यांची पुतणी असुन काका डॉ.नितीन चिखले, काकु डॉ. रश्मी चिखले, बहीण डॉ. पल्लवी चंद्रशेखर चिखले,भाऊ डॉ. सुयोग संजय चिखले, इंजि.अक्षय चंद्रशेखर चिखले,बहीण डॉ.साक्षी संजय चिखले,इंजि.सई विजय चिखले यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून तसेच त्यांच्या पाऊलावर पाऊल ठेवुन वैद्यकीय क्षेत्रात प्रवेश मिळविला. ती चिखले परिवारातील सहावी डॉक्टर होणार आहे. ती आपल्या यशाचे श्रेय वडील विजय चिखले, आई साधना चिखले, मोठे वडील चंद्रशेखर चिखले , संजय चिखले व परिवाराला देते तसेच शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक तसेच शिकवणी वर्गाचे शिक्षक यांना देते.

## महावितरणच्या कार्यकारी संचालकपदी अंकुर कावळे, संदीप पाटील, चंद्रमणी मिश्रा, सुनील काकडे रूजू

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
महावितरणच्या प्रादेशिक संचालक / कार्यकारी संचालकपदी प्रतिनियुक्तीच्या भरती प्रक्रियेतून निवड झाल्यानंतर अंकुर कावळे, संदीप पाटील, चंद्रमणी मिश्रा व सुनील काकडे यांनी नुकताच कार्यभार स्वीकारला. नवनियुक्त कार्यकारी संचालक याआधी महावितरणमध्ये मुख्य अभियंता म्हणून विविध ठिकाणी कार्यरत होते.

कार्यकारी संचालक अंकुर कावळे याआधी मुख्यालयात मुख्य अभियंता (वितरण) म्हणून कार्यरत होते. त्यांनी विद्युत अभियांत्रिकीमध्ये पदव्युत्तर पदवी आणि व्यवस्थापन क्षेत्रातील पदव्युत्तर पदविका संपादन केली आहे. सन १९९७ मध्ये सहायक अभियंता म्हणून कावळे तत्कालिन महाराष्ट्र राज्य विद्युत



मंडळामध्ये रूजू झाले. पदोन्नतींनंतर त्यांनी नाशिक, अहिल्यानगर, पुणे, कोल्हापूर येथे विविध पदांवर काम केले आहे. सन २०२५ पासून ते मुख्य अभियंता म्हणून मुंबई मुख्यालयात कार्यरत होते.

कार्यकारी संचालक संदीप पाटील यांनी विद्युत अभियांत्रिकी पदवी संपादन केली असून सन २००३ मध्ये तत्कालिन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात ते सहायक अभियंता म्हणून रूजू झाले. सन २००९ मध्ये त्यांची थेट भरतीमध्ये कार्यकारी अभियंतापदी निवड झाली. सन २०१८ मध्ये अधीक्षक अभियंतापदी तर सन २०२५ मध्ये त्यांची मुख्य अभियंता म्हणून पदोन्नती झाली. संदीप पाटील हे मुख्य अभियंता (वीज खरेदी) म्हणून मुख्यालयात कार्यरत होते.

कार्यकारी संचालक चंद्रमणी मिश्रा यांनी विद्युत अभियांत्रिकीची पदवी विशेष प्रावीण्यासह संपादन केली आहे. सन २००३ मध्ये तत्कालिन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात ते सहायक अभियंता म्हणून रूजू झाले. त्यानंतर पदोन्नतींवर त्यांनी अलिबाग, वाशी, छत्रपती संभाजीनगर, मुंबई येथे काम केले आहे. सन २००९ मध्ये त्यांची थेट भरतीमध्ये कार्यकारी अभियंता म्हणून निवड झाली. तर सन २०१८ मध्ये अधीक्षक अभियंता म्हणून तर सन २०२४ मुख्य अभियंतापदी पदोन्नतीने झाली. चंद्रमणी मिश्रा कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता म्हणून कार्यरत होते.

कार्यकारी संचालक सुनील काकडे यांनी विद्युत अभियांत्रिकीची पदवी संपादन केली असून १९९७ मध्ये तत्कालिन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळामध्ये ते सहायक अभियंता म्हणून रूजू झाले. त्यानंतर विविध पदांवर त्यांनी चाळीसगाव, नाशिक, भुसावळ, छत्रपती संभाजीनगर, कल्याण, अहिल्यानगर, भांडूप येथे काम केले. काकडे यांची सन २०२२ मध्ये मुख्य अभियंतापदी पदोन्नती झाली. भांडूप परिमंडलानंतर सन २०२५ पासून सुनील काकडे पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता म्हणून कार्यरत होते.

## चंद्रपूर येथे रोकडे ज्वेलर्सच्या भव्य बहुमजली शोरूमचा शुभारंभ

**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर**
गेल्या अनेक वर्षांपासून ज्या क्षणाची चंद्रपूरकर वाट पाहत होते, तो क्षण अखेर साकार झाला आहे. दागिन्यांच्या दुनियेत १२४ वर्षांहून अधिक काळाचा विश्वास आणि पाच पिढ्यांचा समृद्ध वारसा लाभलेले नामांकित 'रोकडे ज्वेलर्स'ने चंद्रपूरमध्ये आपले नवीन भव्य बहुमंजली शोरूम सुरू केले आहे. यासोबतच शहराच्या ज्वेलरी बाजारपेठेत एक नवा अध्याय जोडला गेला आहे. १५ सप्टेंबर रोजी आयोजित या ऐतिहासिक आणि दिमाखदार सोहळ्याला शहरातल्या अनेक दिग्गज, प्रभावशाली व प्रतिष्ठित व्यक्तींसह मोठ्या संख्येने ग्राहक विशेष रूपाने उपस्थित होते.

विशिष्ट पाहुण्यांच्या सन्माननीय उपस्थितीत या सोहळ्याचा औपचारिक शुभारंभ रोकडे कुटुंबाचे ज्येष्ठ स्तंभ भैय्याजी रोकडे आणि वंदना भैय्याजी रोकडे यांच्या हस्ते पारंपरिक दीपप्रज्वलन करून करण्यात आला.

या प्रसंगी रोकडे ज्वेलर्सचे व्यवस्थापकीय संचालक राजेश भैय्याजी रोकडे, संचालक सारंग भैय्याजी रोकडे, संचालक पारस राजेश रोकडे, संचालिका



अनामिका राजेश रोकडे, संस्कृती सारंग रोकडे यांच्यासह शहरातील अनेक मान्यवर नागरिक आणि मोठ्या संख्येने ग्राहक उपस्थित होते. या सर्वांनी रोकडे परिवाराला या नवीन प्रवासासाठी मनापासून शुभेच्छा दिल्या.

**एकाच छताखाली दागिन्यांचे अथांग विश्व**

चंद्रपूर शहरातील प्रमुख भाग असलेल्या गिरनार चौक येथे हे बहुमंजली शोरूम साकारले आहे. हे शोरूम केवळ दागिन्यांच्या खरेदीचे केंद्र नसून, ग्राहकांना एक आधुनिक, प्रीमियम आणि जागतिक दर्जाचा शॉपिंग अनुभव देण्याच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल आहे.

या शोरूममध्ये ग्राहकांसाठी गोल्ड, डायमंड, पोलकी, कुंदन, ब्राइडल आणि फाईन सिल्वर ज्वेलरीचे अत्यंत आकर्षक आणि नवनवीन कलेक्शन उपलब्ध करून देण्यात आले आहेत. पारंपरिक भारतीय दागिन्यांपासून ते आधुनिक डिझाइन्सपर्यंत, विविध सण-उत्सव आणि आवडीनुसार एक विस्तृत रेंज येथे पाहायला मिळेल.

**१२४ वर्षांचा विश्वास पुढे नेण्याचा संकल्प**

या सुवर्णप्रसंगी रोकडे ज्वेलर्सचे व्यवस्थापकीय संचालक राजेश रोकडे यांनी चंद्रपूरकरांचे आभार मानत म्हटले की, ग्राहकांचा विश्वास हीच रोकडे ज्वेलर्सची सर्वात मोठी पुंजी आहे. संस्थेची प्राथमिकता नेहमीच शुद्धता, पारदर्शकता आणि उत्कृष्ट




डिझाईनच्या माध्यमातून ग्राहकांना सर्वोत्तम अनुभव देण्याची राहिली आहे.

ते पुढे म्हणाले की, १२४ वर्षांपासून कायम असलेला विश्वास आणि पाच पिढ्यांचा वारसा पुढे नेत, आता चंद्रपूरकरांना आपल्या आनंदाच्या क्षणांसाठी, विवाह सोहळ्यांसाठी आणि कौटुंबिक उत्सवांसाठी शहरातच जागतिक दर्जाच्या दागिन्यांची विस्तृत शृंखला उपलब्ध होणार आहे.

या भव्य उद्घाटन सोहळ्याला रोकडे परिवाराचे इतर संचालक, प्रमोटर्स, शहरातील नामांकित व्यक्ती, व्यावसायिक क्षेत्रातील प्रतिनिधी तसेच प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सोहळ्यादरम्यान नवीन शोरूमला घेऊन शहरवासीयांमध्ये प्रचंड उत्साह पाहायला मिळाला. रोकडे ज्वेलर्सच्या या नवीन बहुमंजली शोरूमच्या आगमनाला चंद्रपूरच्या सुवर्ण बाजारातील एक महत्त्वपूर्ण विस्तार म्हणून पाहिले जात आहे. परंपरेचा विश्वास, आधुनिकतेचा अनुभव आणि दागिन्यांची अथांग दुनिया यासह रोकडे ज्वेलर्सने चंद्रपूरमध्ये आपली एक नवी ओळख निर्माण केली आहे.

रोकडे परिवाराशी जोडले गेले रितेश आणि जेनेलिया देशमुख ब्रँडच्या या ऐतिहासिक परिवर्तनाचा एक भाग म्हणून, रोकडे ज्वेलर्सने प्रसिद्ध अभिनेते रितेश देशमुख आणि अभिनेत्री जेनेलिया देशमुख यांना आपले अधिकृत ब्रँड ॲम्बेसेडर घोषित केले आहे. महाराष्ट्रात "महाराष्ट्राचे भाऊ आणि वहिनी" म्हणून कमालीची लोकप्रिय असलेली ही जोडी विश्वास, कौटुंबिक मूल्ये, साधेपणा आणि आधुनिक आकांक्षांचे प्रतीक आहे.

**सोन्याचे दागिने पुन्हा बजेटमध्ये!**

- २२ कॅरेट गोल्ड ज्वेलरीवर घडणावळ अवघ्या ५% पासून सुरूः आता ग्राहक केवळ ५% पासून सुरू होणाऱ्या घडणावळीवर प्रमाणित आणि हॉलमार्क असलेले सोन्याचे दागिने खरेदी करू शकतात.

- १८ कॅरेट गोल्ड ज्वेलरीचे विदर्भातील सर्वात मोठे कलेक्शनः आजच्या काळातील ग्राहकांसाठी हलके, मजबूत आणि दैनंदिन जीवनशैलीला साजेसे अशा १८ कॅरेट प्लेन गोल्ड ज्वेलरीचे अथांग कलेक्शन सादर केले जात आहे.

डायमंड, पोलकी आणि ब्राइडल लक्झरीचे नवीन कलेक्शन

आगामी महिन्यांत रोकडे ज्वेलर्स डायमंड, पोलकी आणि ब्राइडल दागिन्यांचे एक विशाल आणि विशेष कलेक्शन सादर करत आहे.

**या विशेष शृंखलेत आम्ही तुमच्यासाठी घेऊन आलो आहोतः**

-दुर्लभ डायमंड मास्टरपीस - जे तुमची चमक अधिक अद्वितीय करतील.

-एक्सक्लुझिव्ह पोलकी क्रिएशन - पारंपरिक कलेचे आधुनिक रूप.

-सिग्नेचर ब्राइडल कलेक्शन - तुमच्या आयुष्यातील सर्वात खास दिवसासाठी.

-लिमिटेड एडिशन डिझायनर ज्वेलरी - अशा डिझाइन्स ज्या पुन्हा मिळणार नाहीत.

**थोडक्यात**

## पोलीस स्टेशन तुमसरकडून गणेशोत्सव उत्सवनिमित्त समाजउपयोगी उपक्रमाचे आयोजन

### गणेशोत्सव निमित्त पोलीस स्टेशनतर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन



**दै. सिंहवाणी वृत्त, तुमसर**
सार्वजनिक गणेशोत्सवाच्या पावन पर्वानिमित्त तुमसर पोलीस स्टेशनच्यावतीने दिनांक १७ सप्टेंबर रोजी पोलीस स्टेशन तुमसर येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जोपासणे व गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे या उद्देशाने सदर उपक्रम नूरुल हसन पोलीस अधिक्षक भंडारा यांचे संकल्पनेतुन निलेश मोरे अपर पोलीस अधिक्षक सा., शिवम विसापुरे प्रभारी उपविभागीय पोलीस अधिकारी तुमसर यांचे मार्गदर्शनात राबविण्यात आला. यावेळी तुमसर पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी, अंमलदार, पोलीस पाटील यांनी शिबिरामध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवत एकूण २३ रक्तदात्यांनी रक्तदान केले त्यामध्ये सुभाष बारसे पोलीस निरीक्षक तथा ठाणेदार पो. स्टे. तुमसर, पोलीस निरीक्षक बाळासाहेब आघाव, पोउपनी प्राची सपकाळ, श्रेणी पोउपनी मनोहर शहारे, पो. हवा. प्रफुल कठाणे, भुमेश्वर पटले, नरेंद्र टेकाडे, पो. शी. अंमोल वाघ, अमोल आदमने, प्रमोद कांबळी, विजय दमाहे, चेतन कुरंजेकर, शैलेश रतनपुरे, सतीश सपकाळ, निखील हिंगे, तुषार कांबळे, निकलेश पिकलमुंडे, देवानंद हलमारे, तसेच पोलीस पाटील उपासराव तितीरमारे, बंटी ईखार, शुभम लांजेवार, व सैनीक उमाशंकर पंचबुधे यांनी स्वच्छेने रक्तदान केले आहे.

याप्रसंगी पोलीस प्रशासनाच्या वतीने रक्तदात्यांचे आभार मानण्यात आले. गणेशोत्सव केवळ धार्मिक उत्सव म्हणून न साजरा करता सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून समाजोपयोगी कार्य करण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

## पीएम सूर्य घर व 'स्मार्ट' योजनेची माहिती आता तालुका पातळीवर; महावितरण उभारणार 'किओस्क'

### १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर दरम्यान 'सेवा सेतू कॅम्प'चे आयोजन, ऑनलाईन अर्ज आणि बँक कर्जाची सुविधा एकाच छताखाली

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
केंद्र सरकारच्या नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाच्या वतीने राज्यात १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत 'सेवा सेतू कॅम्प'चे विशेष आयोजन करण्यात आले आहे. या मोहिमेअंतर्गत 'पीएम सूर्य घर मोफत वीज योजना' आणि 'स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफटॉप सोलर (स्मार्ट)' योजनेची माहिती ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यासाठी महावितरण तालुका पातळीवर विशेष 'किओस्क' उभारणार आहे. महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी सर्व तालुका पातळीवर हे किओस्क उभारण्याचे निर्देश दिले आहेत. या किओस्कच्या माध्यमातून ग्राहकांना रूफटॉप सौर ऊर्जा योजनांचा लाभ घेण्याबाबत प्रत्यक्ष मार्गदर्शन केले जाईल. किओस्कमध्ये सौर योजनेसाठी ऑनलाईन अर्ज कसा करावा, याचे थेट प्रात्यक्षिक व मार्गदर्शन महावितरणच्या कर्मचाऱ्यांकडून केले जाईल.विविध बँकांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे ग्राहकांना घटनास्थळीच ऑनलाईन अर्ज भरण्यासोबतच सोलर सिस्टीमसाठी लागणाऱ्या बँक कजार्साठीही अर्ज करता येईल. 'पीएम सूर्य घर मोफत वीज योजना' आणि 'स्मार्ट' योजनेची सविस्तर माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहे. नागरिकांनी महावितरणच्या या उपक्रमाचा आणि सुविधांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरण प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## लॉयड्सच्या विस्तारीकरणाला महावितरणच्या वीजपुरवठ्याचे बळ, संचालक औंढेकर यांची ग्वाही



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
लॉयड्स मेटल्स ॲण्ड एनर्जी लिमिटेडच्या भविष्यातील विस्तारीकरणाच्या योजनेसाठी मागणीप्रमाणे वाढीव भारासह दर्जेदार वीजपुरवठा उपलब्ध करून दिला जाईल. तसेच तत्पर वीजसेवेसाठी कायमच प्राधान्य दिले जाईल अशी ग्वाही महावितरणचे संचालक (संचालन) धनंजय औंढेकर यांनी दिले. जिल्ह्यातील कोन्सारी (ता. चामोर्शी) येथील लॉयड्स मेटल्समध्ये संचालक धनंजय औंढेकर यांनी भेट दिली व वीजपुरवठ्याबाबत कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा केली. लॉयड्स कंपनीच्या सुरजागड (खाणकाम) आणि कोन्सारी (प्रक्रिया प्रकल्प/स्टील प्लांट) या दोन्ही प्रकल्पांना महावितरणकडून स्वतंत्र दोन वीजजोडण्यांद्वारे ७२ एमव्हीए क्षमतेचा वीजपुरवठा करण्यात येत आहे. या भेटीत संचालक औंढेकर यांनी कंपनीमधील वीजपुरवठ्याचा आढावा घेतला व संबंधित यंत्रणेची पाहणी केली. लॉयड्स कंपनीकडून भविष्यात प्रकल्प विस्तारीकरणाची योजना आहे. त्यासाठी महावितरणकडून मागणीप्रमाणे विजेचा भार व पुरवठा उपलब्ध करून दिला जाईल अशी ग्वाही औंढेकर यांनी दिली.

यावेळी मुख्य अभियंता हरिश गजबे, अधीक्षक अभियंता प्रकाश खांडेकर, लॉयड्स कंपनीच्या इलेक्ट्रिकल आणि इन्स्टुमेंटेशन विभागाचे वरिष्ठ महाव्यवस्थापक (संचालन) अरिंदम चंदा व अमूल्य साबत (प्रकल्प), उपमहाव्यवस्थापक एस. प्यारे लाल (संचालन), वरिष्ठ व्यवस्थापक राहुल रामगिरवार (प्रकल्प), व्यवस्थापक शुभम कुमार (प्रकल्प), विभागप्रमुख (प्रशासन) वेणू गोपाळ, कार्यकारी अभियंता जितेंद्र वाघमारे आदींची उपस्थिती होती.

थोडक्यात

## भाजप काटोल जिल्ह्याचावतीने अदासा येथे २ हजाराहून अधिक दिव्यांनी उजळला परिसर

### आशीर्वादाचा दिवा व महाआरती उत्साहात संपन्न



**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी, काटोल जिल्ह्याच्या वतीने आदासा येथील श्री गणेश मंदिरात 'आशीर्वादाचा दिवा व महाआरती' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी २,००० पेक्षा अधिक दिवे प्रज्वलित करून भव्य दीपोत्सव साजरा करण्यात आला. हजारो दिव्यांच्या प्रकाशाने श्री गणेश मंदिर परिसर उजळून निघाला. यानंतर श्री गणरायाची महाआरती करण्यात आली. राष्ट्राचे सुख-समृद्धी, देशाची प्रगती, सर्व नागरिकांचे आरोग्य व मंगलमय जीवन यासाठी श्री गणरायाच्या चरणी प्रार्थना करण्यात आली.

या कार्यक्रमास आमदार डॉ. राजीव पोतदार, माजी आमदार श्री. सुधाकर कोहळे, भाजपा जिल्हाध्यक्ष मनोहरजी कुंभारे, रामरावजी मोवाडे, संदीप सरोदे, प्रकाश टेकाडे, महामंत्री आदर्श पटले, दिनेश ठाकरे, मंदार मंगळे, उपाध्यक्ष धनराज देवके व सौ. प्रिया मानकर यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमास भाजपा पदाधिकारी, मंडळ अध्यक्ष, लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दीपोत्सव आणि महाआरतीमध्ये भक्तिभावाने सहभाग नोंदविला. यावेळी बोलताना उपस्थित मान्यवरांनी भारतीय संस्कृती, श्रद्धा आणि सामाजिक एकोपा जपण्यासोबतच देशाच्या प्रगतीसाठी सकारात्मक योगदान देण्याचे आवाहन केले.

## रावसाहेब पतंगे महाविद्यालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा



**दै. सिंहवाणी वृत्त, वसमत**

रावसाहेब पतंगे महाविद्यालय, कला महाविद्यालय मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या माध्यमातून मराठवाड्याच्या स्वातंत्र्यासाठी लढा देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिक व हुतात्म्यांच्या त्यागाचे स्मरण करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य शिवकुमार पांचाळ सर, प्रा.मिलिंद आळणे, प्रा.सर्जेराव गायकवाड, प्रा.संदीप काटकर, वरिष्ठ लिपिक कांबळे, फेगडे, जाधव , कनिष्ठ लिपिक साबळे आणि विजय राऊत सर यांच्यासह महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी मराठवाडा मुक्ती संग्रामाचा इतिहास व त्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. मराठवाड्याच्या मुक्तीसाठी स्वातंत्र्यसैनिकांनी दिलेल्या योगदानाची माहिती देत त्यांच्या त्यागातून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी, असे आवाहन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

## गोंदिया जिल्ह्याच्या कन्येने दक्षिण कोरियात रचला गौरवशाली इतिहास

### वर्ल्ड तायक्वांदो पूमसे चॅम्पियनशिपमध्ये कांस्यपदकाची कमाई, भारताचा मान उंचावला

**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे- सालेकसा**

सालेकसा तालुक्यातील खेडेपार, जिल्हा गोंदिया येथील प्रतिभावान कन्या कु. विद्या येशूलाल नागपुरे हिने आंतरराष्ट्रीय स्तरावर



शानदार कामगिरी करत दक्षिण कोरियात आयोजित २०२६ वर्ल्ड तायक्वांदो पूमसे चॅम्पियनशिपमध्ये कांस्यपदक पटकावून आपल्या कुटुंबासह गाव, समाज आणि संपूर्ण गोंदिया जिल्ह्याचे नाव उज्ज्वल केले आहे. विद्याची निवड दिल्ली येथे आयोजित तायक्वांदो स्पर्धेतील उत्कृष्ट कामगिरीच्या आधारे झाली होती. त्यानंतर तिने दक्षिण कोरियात आयोजित विश्वस्तरीय स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व केले. ५२ किलो वजन गटात खेळताना विद्याने उत्कृष्ट प्रदर्शन, शिस्त आणि अथक परिश्रमाच्या जोरावर कांस्यपदकावर आपले नाव कोरले.

**मेहनत, जिद्द आणि चिकाटीची प्रेरणादायी कहाणी**

२००४ मध्ये जन्मलेल्या विद्या येशूलाल नागपुरे हिने सातत्यपूर्ण मेहनत, जिद्द, शिस्त आणि समर्पणाच्या बळावर ही उल्लेखनीय कामगिरी साध्य केली आहे. तिच्या या यशामुळे आई छमिताबाई, वडील येशूलाल, भाऊ नितीन, आजी सावनाबाई यांच्यासह संपूर्ण नागपुरे परिवारात आनंदाचे वातावरण आहे. गावातील एका सामान्य कुटुंबातील कन्येपासून आंतरराष्ट्रीय क्रीडा मंचापर्यंतचा विद्याचा हा प्रवास परिसरातील युवा पिढीसाठी प्रेरणादायी ठरला आहे. प्रतिभा, मेहनत आणि दृढनिश्चयाच्या जोरावर कोणतेही ध्येय गाठता येते, हे विद्याने आपल्या कामगिरीतून सिद्ध केले आहे.

विद्याच्या या शानदार यशाबद्दल खेडेपार सरपंच महेश लिल्हारे, आलोक महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष नरेंद्रकुमार लिल्हारे, आलोक महाराष्ट्र प्रदेश मिडिया प्रभारी राजकुमार बसोने सालेकसा तसेच संपूर्ण गोंदिया जिल्ह्यातील नागरिक आणि समाजबांधवांकडून तिचे मनःपूर्वक अभिनंदन व उज्ज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहे.

# दुष्काळी परिस्थितीचा अंतिम अहवाल आल्यानंतर मदतीचा निर्णय

## थातूरमातूर निर्णय न घेता शेतकऱ्यांना भक्कम मदत देणारः महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

राज्यातील दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रिमंडळ बैठकीत सर्व विभागांना तातडीने सर्वेक्षण करून आवश्यक उपाययोजना करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. त्यानुसार महसूल विभागासह सर्व यंत्रणा कामाला लागल्या असून, पंचनामे आणि सर्वेक्षणाचे काम सुरू आहे. सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर परिस्थितीचा संपूर्ण डेटा उपलब्ध होईल आणि त्याच्या आधारे शेतकऱ्यांसाठी कोणत्या उपाययोजना करायच्या तसेच केंद्र सरकारकडे कोणते प्रस्ताव पाठवायचे, याचा निर्णय घेतला जाईल, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. ते नागपुरात माध्यमांशी बोलत होते.

राज्यातील १८ जिल्ह्यांचा प्राथमिक अहवाल यापूर्वीच प्राप्त झाला आहे. अंतिम अहवाल मंगळवार किंवा बुधवारपर्यंत अपेक्षित असून, त्यानुसार मदतीबाबत निर्णय घेतला जाईल. दुष्काळी परिस्थितीला मुख्यमंत्र्यांनी सर्वोच्च प्राधान्य दिले असून सर्व विभागांना कामाला लावले आहे. मुख्यमंत्री संवेदनशील असून शेतकऱ्यांना आवश्यक ती मदत देण्यासाठी सरकार गंभीरपणे काम करीत आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**पालकमंत्र्यांना प्रत्यक्ष पाहणीच्या सूचना**

दुष्काळी परिस्थितीची खरी वस्तुस्थिती समोर यावी यासाठी सर्व जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांना प्रभावित भागांची प्रत्यक्ष पाहणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. आमदारांनीही शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घ्याव्यात, असे निर्देश देण्यात आले आहेत. थातूरमातूर निर्णय न घेता सरकारकडे संपूर्ण आणि अचूक डेटा असावा, या उद्देशाने सर्वेक्षण सुरू आहे, असे बावनकुळे म्हणाले.

**चारा छावण्यांमध्ये भ्रष्टाचाराला थारा नाही**

मागील काळात मोठ्या प्रमाणावर



चारा छावण्या सुरू करण्यात आल्या होत्या. मात्र काही कंत्राटदारांनी त्याचा गैरफायदा घेतल्याच्या तक्रारी झाल्या होत्या. यावेळी चारा छावण्यांच्या माध्यमातून कोणत्याही प्रकारचा भ्रष्टाचार होऊ दिला जाणार नाही.

**कृत्रिम पावसाचा प्रयोग प्रभावी ठरलेला नाही**

कृत्रिम पावसाच्या प्रयोगाला आतापर्यंत अपेक्षित यश मिळालेले नाही. मात्र परतीचा पाऊस चांगला झाला तर दुष्काळसदृश परिस्थितीची तीव्रता निश्चितच कमी होऊन शेतकऱ्यांना दिलासा मिळू शकतो.

**आयोगांचे अहवाल नियमानुसार जाहीर करणार**

विविध आयोगांचे अहवाल ज्या नियमांनुसार आणि ज्या ठिकाणी जाहीर करणे अपेक्षित आहे, त्याच पद्धतीने ते जाहीर केले जातील.

**आजारी बालिकेच्या उपचारासाठी मुंबई महापालिकेला निर्देश**

श्रीनिका या आजारी बालिकेच्या उपचाराबाबत मुख्यमंत्र्यांची भेट घेण्यात आली आहे. सध्या मुंबईतील नायर रुग्णालयात तिच्यावर उपचार सुरू आहेत. आवश्यक इंजेक्शन मुंबई महानगरपालिकेने खरेदी करून बालिकेला उपलब्ध करून द्यावीत, असे निर्देश देण्यात आले आहेत. महापौर आणि महापालिका आयुक्त बालिकेला योग्य उपचार मिळतील याची व्यवस्था करतील, असेही त्यांनी सांगितले.

**'महा खनिज २.०'द्वारे वाळू व्यवहारावर नियंत्रण**

राज्यात 'महा खनिज २.०' जाहीर करण्यात आले असून त्यासाठी कोकण विभागीय आयुक्तांच्या नियंत्रणाखाली विशेष वॉर रूम सुरू करण्यात येणार आहे. वाळूच्या संदर्भातील अनेक नियमांमध्ये बदल करण्यात येत असून, संपूर्ण राज्यातील वाळू वाहतूक आणि व्यवहारावर नियंत्रण ठेवण्यात येणार आहे. या माध्यमातून राज्याला मोठ्या प्रमाणात महसूल मिळण्याची अपेक्षा असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.

**शक्तीपीठ महामार्गासाठी संयुक्त सर्वेक्षण**

शक्तीपीठ महामार्गाला ज्या ठिकाणी विरोध होत आहे, तेथे काही राजकीय व्यक्ती विरोधाला प्रोत्साहन देत आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीच्या मोबदल्यात बाजारमूल्याच्या तुलनेत चांगला मोबदला मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले. शक्तीपीठ महामार्ग हा राज्याच्या आर्थिक विकासाला आणि पायाभूत सुविधांच्या विस्ताराला चालना देणारा प्रकल्प आहे. समृद्धी महामार्गाचे उदाहरण देत या महामार्गामुळे राज्याच्या विकासाला गती मिळेल.

**इंडी आघाडीचे जहाज बुडाले**

'इंडी आघाडीचे जहाज बुडाले आहे. मागील दोन वर्षांत त्यांची बैठकही झालेली नाही''. तृणमूल काँग्रेसकडे निवडणूक चिन्ह टिकवण्यासाठी आवश्यक संख्याबळ नाही. त्यामुळे काँग्रेस आणि उद्धव ठाकरे यांनी आपापल्या पक्षाची चिंता करावी. ममता बॅनर्जी त्यांच्या पक्षाची चिंता करण्यासाठी सक्षम आहेत. २०२९ मध्ये काँग्रेससमोरही अशाच प्रकारची परिस्थिती निर्माण होईल.

## ब. रू. हायस्कूलमध्ये निःशुल्क हेल्मेट वितरण

### आयसीआयसीआय लोम्बार्ड व प्रभाव फाउंडेशन यांचे सहकार्य



**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**

बनारसीदास रुईया हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, काटोल, आयसीआयसीआय लोम्बार्ड व प्रभाव फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमानाने रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत रस्ता सुरक्षा विषयावर मार्गदर्शन तसेच विद्यार्थी व पालकांना निःशुल्क हेल्मेट वितरण कार्यक्रम बुधवारी काटोल येथील ब. रू. हायस्कूलच्या प्रांगणात घेण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान बनारसीदास रुईया हायस्कूल कमिटीचे अध्यक्ष डॉ. दिलीप चांडक यांनी भूषविले. बनारसीदास रुईया हायस्कूल कमिटीचे सचिव प्रकाश नबीरा, या उपक्रमाचे व्यवस्थापक व समन्वयक अश्वनी बजाज, नागपूर येथील बाबा नानक हायस्कूलच्या माजी मुख्याध्यापिका सुनीता बजाज, गजानन विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक निलेश चौधरी, या उपक्रमाचे प्रकल्प समन्वयक मानस स्वेन, प्रकल्प समन्वयक नितीन दहिया, बनारसीदास रुईया हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापिका वंदना काळे, उपमुख्याध्यापक हिरामण सोमकुवर, पर्यवेक्षक अजय खडसे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

पाहुण्यांचा परिचय व प्रास्ताविक या उपक्रमाचे शाळेतील समन्वयक तथा शिक्षक पराग करांडे यांनी केले. रस्ते सुरक्षा या विषयावर विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन अश्वनी बजाज, सुनीता बजाज व निलेश चौधरी यांनी केले. सूत्रसंचालन कौस्तुभ पवार तर आभार मुख्याध्यापिका वंदना काळे यांनी मानले. शाळेच्या वतीने आयसीआयसीआय लोम्बार्ड व प्रभाव फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांना आभार पत्र देण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रभाव फाउंडेशनचे तुषार गाडगे, सचिन बोधे, मोरेश्वर बडवाईक अरविंद पांडे यांच्यासह शाळेतील शिक्षक प्रतिनिधी ज्येष्ठ शिक्षक भोजराजन चंदन, धीरज ढोले, नारायण कावडकर, भास्कर सिरसाट, निकेश बनसोड, सागर ढोके, अमित कोट्टेवार, प्रवीण चौधरी, विश्वेश्वर कोरडे, संदीप बांबल, ज्येष्ठ शिक्षिका हर्षाली थोटे, मीनल गिरडकर, लीना राखुंडे, निरुपमा लांडे, ममता पिपरे, रूपाली तायडे, शुभांगी गजभिये, किरण मोरे, नलिनी फरकाडे आदी शिक्षकांसह गोपाल तांबुसकर, लता वानखडे, रामचंद्र सलाम, विवेक टेंभे आदींनी सहकार्य केले.

**बाईक रॅलीचे आयोजन**

हेल्मेट वितरणानंतर विद्यार्थी व पालकांसाठी बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले. बनारसीदास रुईया हायस्कूल कमिटीचे अध्यक्ष डॉक्टर दिलीप चांडक, सचिव प्रकाश नबीरा यांच्यासह आयसीआयसीआय लोम्बार्ड व प्रभाव फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनी झेंडी दाखवत रॅलीचा शुभारंभ केला. यावेळी हेल्मेट परिधान केलेले दुचाकीस्वार पालक व विद्यार्थी यांनी काटोल शहरात रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत बाईक रॅली काढत हेल्मेट वापरा संदर्भात जनजागृती केली.

## मतदार नोंदणीसाठी शिबिरांचे आयोजन

### १९, २०, २६ व २७ सप्टेंबर रोजी मतदान केंद्रावर विशेष नोंदणी शिबिर

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशांनुसार १ ऑक्टोबर २०२६ या अर्हता दिनांकावर आधारित मतदार याद्यांच्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम घोषित झाला असून गैरहजर, स्थलांतरित किंवा इतर कारणामुळे मतदार यादीत नाव समाविष्ट करून न शकलेल्या मतदारांना त्यांच्या सध्याच्या सर्वसाधारण रहिवासाच्या ठिकाणाहून मतदार यादीमध्ये नव्याने नाव अंतर्भूत करण्यात दावे व हरकतीच्या कालावधीमध्ये संधी उपलब्ध झालेली आहे. जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रांवर विशेष नोंदणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले असून दि.१९,२०,२६ आणि २७ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत या शिबिराच्या माध्यमातून नवमतदारांना नोंदणी करता येईल.

दिनांक १ ऑक्टोबर २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी वयाची १८ वर्षे पूर्ण होणाऱ्या सर्व नवमतदारांना आणि १ ऑक्टोबर २०२४ नंतर १८ वर्षे पूर्ण होऊनही नोंदणी करू न शकलेल्यांना मतदार यादीत नाव नोंदवता येईल. सर्व मतदान केंद्रस्तरीय अधिकारी आयोजित शिबिरांमध्ये सकाळी दहा ते संध्याकाळी सहा वाजेपर्यंत नवीन नोंदणीसाठी नमुना क्र ६ , नमुना क्र, ७ व नमुना क्र ८ उपलब्ध करून देतील व नागरिकांकडून मतदार नोंदणी, दुरुस्ती व वगळणीचे अर्ज भरून घेतील. मतदार नोंदणी अधिकारी, सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी व संबंधित काही विशेष शिबिरांना भेटी देऊन तेथील कामकाजाचे पर्यवेक्षण व मार्गदर्शन करतील. या शिबिरांमध्ये महिला तसेच दिव्यांग नागरिकांचे नाव नोंदणी आणि समावेशनासाठी विशेष प्राधान्य दिले जाईल. शाळा व महाविद्यालयांमधील विशेष मोहीमेअंतर्गत सुट्टीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेत विशेष नोंदणी शिबिरांचे आयोजन केले जाईल.

# घरच्या घरी साकारला इकोफ्रेंडली गणपती, सृष्टी कोठावदेची कलाकृती ठरतेय आकर्षणाचा केंद्रबिंदू

**दै. सिंहवाणी वृत्त**

गणेशोत्सव म्हटला की, घराघरांत आणि सार्वजनिक मंडळांमध्ये गणरायाच्या आगमनाची लगबग सुरू होते. विविध आकारांच्या, आकर्षक रंगसंगतीच्या गणेशमूर्तींसह पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याकडेही नागरिकांचा कल वाढताना दिसत आहे. याच पार्श्वभूमीवर ॲड. शलाका कोठावदे यांच्या कुटुंबीयांनी घरच्या घरी साकारलेल्या इकोफ्रेंडली गणेशमूर्तीने यंदाच्या गणेशोत्सवात विशेष लक्ष वेधून घेतले आहे.



सध्या गणेशोत्सवात अनेक कुटुंबे बाहेरून गणेशमूर्ती आणून विधिवत प्रतिष्ठापना करतात. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांकडूनही विविध संकल्पनांवर आधारित गणेशमूर्ती साकारल्या जातात. मात्र, कोठावदे कुटुंबीयांनी याला एक वेगळा आणि पर्यावरणपूरक आयाम दिला आहे. बाजारातून तयार मूर्ती आणण्याऐवजी घरामध्येच इकोफ्रेंडली गणेशमूर्ती तयार करण्याचा उपक्रम त्यांनी राबविला आहे. या गणेशमूर्तीचे वैशिष्ट्य म्हणजे मूर्ती तयार करण्यापासून तिच्यावर रंगकाम करण्यापर्यंतची प्रक्रिया घरच्या घरी करण्यात आली आहे. मूर्तीला अचूक आणि सुबक पद्धतीने रंग देत तिचे सौंदर्य खुलविण्यात आले आहे. त्यानंतर आकर्षक दागिने, अलंकार तसेच विविध सजावटीच्या साहित्याचा वापर करून गणरायाची मनोहारी सजावट करण्यात आली आहे. त्यामुळे ही मूर्ती केवळ पर्यावरणपूरकच नाही, तर कलात्मक दृष्ट्याही उठून दिसत आहे. या सुंदर गणेशमूर्तीची निर्मिती ॲड.शलाका कोठावदे यांची सुकन्या सृष्टी कोठावदे हिने केली आहे. स्वतःच्या कल्पकतेतून आणि कलागुणांतून सृष्टीने गणेशमूर्तीला आकार दिला. त्यानंतर रंगकाम व सजावटीच्या माध्यमातून मूर्तीला आकर्षक स्वरूप प्राप्त करून दिले.

लहान वयातच पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार करण्याचा घेतलेला हा पुढाकार निश्चितच कौतुकास्पद असल्याचे पाहुणे व मित्रमंडळींकडून सांगितले जात आहे. गणेशोत्सवाच्या काळात कोठावदे कुटुंबीयांच्या घरी दर्शनासाठी येणारे पाहुणे, नातेवाईक आणि मित्रमंडळी या गणेशमूर्तीचे तसेच करण्यात आलेल्या सजावटीचे आवर्जून कौतुक करत आहेत. स्वतःच्या हाताने तयार केलेली गणेशमूर्ती, पर्यावरणपूरकतेचा विचार आणि कलात्मक सजावट यांचा सुंदर संगम या उपक्रमातून पाहायला मिळतो.

आजच्या काळात पर्यावरण संवर्धनाची गरज लक्षात घेता गणेशोत्सवासारख्या मोठ्या उत्सवात पर्यावरणपूरक पर्यायांचा स्वीकार करणे महत्त्वाचे ठरत आहे. कोठावदे कुटुंबीयांनी घरच्या घरी इकोफ्रेंडली गणेशमूर्ती साकारून 'उत्सवही आनंदाचा आणि पर्यावरणाचीही जपणूक' असा संदेश दिला आहे. विशेष म्हणजे, या उपक्रमातून केवळ पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेशच दिला जात नाही, तर घरातील मुलांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्याबरोबरच पुढील पिढीमध्ये पर्यावरणाबाबतची जाणीव निर्माण करण्याचा आदर्शही समोर येतो. त्यामुळे कोठावदे कुटुंबीयांचा हा घरगुती इकोफ्रेंडली गणपती गणेशभक्तांसाठी आणि भावी पिढीसाठी प्रेरणादायी ठरत आहे.



'जरीपटका चा राजा'
जरीपटका, नागपूर



हिंगवे परिवाराकडील दीडशे वर्षापासून नियमित स्थापित महालक्ष्मी, खामला, नागपूर



आशाताई गायकवाड
नवीन सोमवारी पेठ, रघुजी नगर, नागपूर



श्री. बळवंतराव गायकवाड, गणेशपेठ नागपूर



समाजसेवी संजय मानकर यांच्या घरी विराजमान गणपती बाप्पा



हेमलता मनोज सावजी, नगराध्यक्षा महादुला नगरपंचायत, सहकुटुंब घरच्या बाप्पासोबत



श्यामल आणि आदित्य देशमुख,
प्रभू नगर, न्यू मनीष नगर, नागपूर



कापसे परिवार, खैरी, जि. नागपूर यांच्या घरी विघ्नहर्ता बाप्पाची स्थापना



निखिल शेलार, चंदननगर, नागपूर



राजू काळे, स्पर्श राजू काळे
सरस्वती नगर, मानेवाडा रिंग रोड, नागपूर



प्रकाश बेतावार, मनीष नगर, नागपूर



श्रीराम फायनान्स लिमिटेड, म्हाळगी नगर शाखा, रिजनल कार्यालय

## कोदामेंढीत सेवा संकल्प अभियानांतर्गत आशीर्वादाचा दिवा हा प्रेरणादायी कार्यक्रम संपन्न

**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू-मौदा :** भारत देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७६ व्या वाढदिवसानिमित्त सेवा संकल्प अभियानांतर्गत आशीर्वादाचा दिवा हा प्रेरणादायी कार्यक्रम कोदामेंढी येथे दीप प्रज्वलित करून साजरा करण्यात आला. याप्रसंगी भाजपा तालुका मौदा मंडळ अध्यक्ष भगवान बावनकुळे, तालुका समन्वय समिती सदस्य नरेश बावनकुळे उपसरपंच गोपाल गिरमेकर, उषा भगवान बावनकुळे,शाखाध्यक्ष रघुनाथ मांदाळे, दीपक बावनकुळे सह भाजपा व भाजयूमो पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





आनंद बरडे, धंतोली, नागपूर
यांचेकडील महालक्ष्म्या.



केतन कैलास बानाईत, महालक्ष्मी नगर, मानेवाडा रोड, नागपूर

# शेतात काम करताना वीज कोसळून शेतकऱ्याचा मृत्यू

**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

अकोला-विरली परिसरात आज, दि. १८ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास शेतात काम करत असताना अंगावर वीज कोसळल्याने शेतकरी महादेवजी साखरकर वय ६५ यांचा दुर्दैवी मृत्यू झाला.



महादेवजी साखरकर हे शेतात काम करीत असताना अचानक वीज कोसळली. त्यातच त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे अकोला-विरली परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

घटनेची माहिती मिळताच संबंधित यंत्रणेने घटनास्थळी धाव घेतली. त्यांना गाडीतून उमरेड येथील ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. या घटनेचा पुढील तपास सुरू आहे.

## सारजाबाई आनंदराव जीवतोडे यांचे निधन



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

(वय ८५) रा. संग्रामपूर यांचे वृद्धकाळामुळे आज सकाळी आठ वाजता निधन झाले. त्यांच्या पश्चात पाच मुलं दोन मुली व नातवंड असा मोठा परिवार होता. त्यांची अंत्यसंस्कार संग्रामपूर घाटावर करण्यात आला. अंतयात्रेला फार मोठा जनसमुदाय जमला होता.

## काशीराम किसनराव सोनुने यांचे निधन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

रा. ९६, झाडे -ले -आऊट भरत नगर, नागपूर येथील रहिवासी, काशीराम किसनराव सोनुने यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ८६ वर्ष होते. उद्या शनिवारी १९ सप्टेंबर रोजी, दुपारी १२ वाजता. अंबाझरी घाटावर अंतिम संस्कार करण्यात येईल.

## योगेश कन्नाके यांचे निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

नगर परिषद उमरेड प्रभाग क्र.९ चे नगरसेवक योगेश कन्नाके



(वय ३२) यांचे दुःखद निधन झाले. भिवापूर रोड स्थित स्मशानभूमि येथे अंत्यविधी झाली. त्यांच्या निधनाने सामाजिक व सार्वजनिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्या निधनाबद्दल समस्थ नगरसेवक, नगरसेविका, नगर परिषद, नगर काँग्रेस कमिटी, उमरेड यांनी शोक व्यक्त केला आहे.

# महागौरी महालक्ष्मीचा तीन दिवसांचे भव्य आयोजन

## तीन पीढ्यांची परंपरा पुढे नेत आहे शहरातील बांगरे व मुलमुले कुटुंब

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

गणेशोत्सवाबरोबरच महागौरी महालक्ष्मीच्या स्थापनेचे स्वतःचे महत्त्व पौराणिक ग्रंथांमध्ये सांगितले आहे. त्याअंतर्गत, गेल्या तीन दिवसांपासून, पारंपारिकपणे महागौरी महालक्ष्मीची स्थापना केली जाते आणि महालक्ष्मीची पूजा केली जात आहे.

पारंपारिकपणे, १६ सप्टेंबर रोजी शहरात अनेक ठिकाणी महागौरी महालक्ष्मीचे आवाहन केले जाते व विधिवत पूजा केल्यानंतर प्रतिष्ठापना केली जाते आणि दुसऱ्या दिवशी, विधीवत सजावट आणि पूजा केली जाते आणि विविध पदार्थांचा महाभोग अर्पण केला जातो आणि रोषणाई आणि महाप्रसादाचे आयोजन केले जाते. त्यामुळे महागौरी महालक्ष्मीच्या दोन्ही बहिणी ज्येष्ठा आणि कनिष्ठा यांच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी जमते आणि भक्त स्वतःला महालक्ष्मीचे पात्र मानतात.

भोंगाडे लेआउट स्टेशन रोड येथील शहरातील प्रसिद्ध उद्योजक बांगरे ज्वेलर्सचे संचालक अतुल शंकरराव बांगरे यांच्या निवासस्थानी तीन दिवसांची महागौरी महालक्ष्मीची स्थापना करण्यात आली आणि तीन पिढ्यांपासून चालत आलेली परंपरा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शहरातील शेकडो मान्यवरांनी त्यांच्या कुटुंबियांसह या कार्यक्रमाला उपस्थिती लावली आणि महालक्ष्मी मातेच्या दर्शनाचा लाभ घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अतुल बांगरे, वत्सल बांगरे आणि संपूर्ण कुटुंबाने परिश्रम घेतले.

त्याचप्रमाणे शहरातील माजी नगराध्यक्षा पल्लविताई जयंतराव मुलमुले यांच्या निवासस्थानी पारंपारिक महागौरी महालक्ष्मीची स्थापना करण्यात आली आणि विविध प्रकारचे छप्पन भोग महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. शहरातील मान्यवरांनी माता महागौरीचे दर्शन आणि महाप्रसाद घेतल्यानंतर, तिसऱ्या दिवशी,



अश्रूंनी माता महागौरीला निरोप देण्यात आला. या भव्य कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जयंत मुलमुले,धनराज मुलमुले ॲड. अभिषेक मुलमुले आणि कुटुंबातील सदस्यांनी परिश्रम घेतले.

# विजांच्या कडकडाटासह मुसळधार

## सर्वत्र विजांचा लखलखाट, मेघ गर्जना व वादळ वारा, पारशिवनी शहर अंधारात




**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

पारशिवनी आणि परिसरामध्ये आज, १८ सप्टेंबर २०२६ रोजी विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाने पारशिवनी व ग्रामीण भागात थैमान घातले होते. मेघ गर्जननेसह विजेच्या कडकडाट पाहता नागरीकात भितीचे वातावरणात निर्माण झाले होते.

शुकवार दि.१८ सप्टेंबर ला सायकाळी ६ वाजता आकाशात मैघ गर्जना नी परीसरात भितीचे वातावरण निर्माण झाले होते. तर सोबतच मुसळधार पावसाने सर्वत्र थैमान घातल्याने अनेक ठिकाणी झाडे कोसळण्याच्या घटना घडल्या. तर सायंकाळी परीसरातील विद्युत विभागाची यंत्रणा या पावसात कुचकामी ठरल्याने पारशिवनी शहर कित्येक तास अंधारात होते.

मोठ्या प्रमाणात पाऊस आल्याने शेत पिकांचे नुकसान होण्याची शक्यता वर्तवण्यात येत असुन पावसाला अंधाराची जोड असल्याने नुकसानीची माहिती अद्याप समोर आली नसुन विजेच्या कडकडाट पाहता परिसरात भितीचे वातावरण निर्माण झाले होते. पारशिवनी शहर पुर्णतः अंधारात होते.

## 'स्नेहसदन' विशेष शाळेत गणरायाचे उत्साहात आगमन, १० दिवसांत सामाजिक उपक्रमांचे आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

शितलवाडी, रामटेक येथील स्नेहसदन बौद्धिक अक्षम मुलांच्या विशेष शाळेत लाडक्या गणरायाचे अत्यंत उत्साही, मंगलमय आणि भक्तीमय वातावरणात आगमन झाले आहे. बाप्पाच्या आगमनाने शाळेचा संपूर्ण परिसर भक्तीरसात न्हाऊन निघाला असून, विशेष बालकांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद आणि उत्साह ओसंडून वाहत आहे.या गणेशोत्सवाच्या १० दिवसांच्या कालावधीत केवळ धार्मिक विधी न करता, विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारे आणि समाजाला एक नवा सकारात्मक संदेश देणारे विविध स्तुत्य उपक्रम शाळेच्या वतीने राबवले जाणार आहेत.



यामध्ये 'इको क्लब'च्या माध्यमातून विशेष स्वच्छता मोहीम आणि वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला जाईल. तसेच मुलांच्या कल्पकतेला वाव देण्यासाठी आकर्षक रांगोळी स्पर्धांचेही आयोजन करण्यात आले आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त विशेष उपक्रमयाच सोहळ्याचे औचित्य साधून भारताचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त शाळेत विविध विशेष कार्यक्रम होणार आहेत. यामध्ये विद्यार्थ्यांनी साकारलेली 'मनुष्य रांगोळी' हे मुख्य आकर्षण असणार आहे. या माध्यमातून देशहिताचा आणि सामाजिक एकतेचा संदेश ही विशेष मुले समाजाला देणार आहेत.

स्नेहसदन शाळेतील शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन आणि या विशेष मुलांचा उत्साह यामुळे शाळेत सध्या आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. समाजातील प्रत्येक घटकाने या मुलांच्या पाठीवर कौतुकाची थाप द्यावी, असे आवाहन शाळा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

थोडक्यात

## इनर व्हील क्लब ऑफ नागपूरच्यावतीने दहीहंडी स्पर्धेचे आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

इनर व्हील क्लब ऑफ नागपूर, डिस्ट्रिक्ट ३०३च्या अध्यक्षा पूजा सावजी यांच्या नेतृत्वाखाली गांधी नगर येथील लोकमान्ये



कॉन्व्हेंट येथे उत्साहपूर्ण दहीहंडी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये उत्साह, आनंद आणि सांघिक भावना निर्माण करण्याच्या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. इनर व्हील क्लब ऑफ नागपूरच्या सदस्यांचे शाळेच्या मुख्याध्यापिका लाडखेडकर यांनी स्वागत केले. स्पर्धेत विद्यार्थ्यांच्या पाच गटांनी सहभाग घेतला, तर सुमारे ५० विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष सहभाग नोंदवला. चॉकलेट्स आणि कुकीजने भरलेली मातीची हंडी फोडण्यासाठी विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने आणि जिद्दीने प्रयत्न केले. मुलींच्या गटाने यशस्वीपणे दहीहंडी फोडून विजेतेपद पटकावले.

उत्सवाचा आनंद द्विगुणित करण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांना राजगिरा लाडू वाटण्यात आले तसेच गोपालकाला देण्यात आली. सुमारे ३०० विद्यार्थी हा उत्साहपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी आणि सहभागी विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवण्यासाठी उपस्थित होते. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना आनंदाने उत्सव साजरा करण्यासोबतच सांघिक भावना, आत्मविश्वास आणि सहभागाची भावना विकसित करण्याची संधी मिळाली. विद्यार्थ्यांचा उत्साह आणि आनंद यामुळे हा कार्यक्रम संस्मरणीय ठरला. या उपक्रमाला डॉ. माधुरी वाघ, लक्ष्मी झा, साधना पाटकी आणि क्रड अंशु शुक्ला यांची उपस्थिती व सहकार्य लाभले.

## जिल्हास्तरीय विज्ञान मेळाव्यात समीक्षा राठोडची चमकदार कामगिरी

### 'भारतीय ऊर्जा क्षेत्र २०४७' विषयावर प्रभावी मांडणी; जिल्ह्यात पटकावला द्वितीय क्रमांक



**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

राज्य विज्ञान मंडळ, नागपूर यांच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळाव्यात नरखेड तालुक्यातील एस.आर.के. इंडो पब्लिक स्कूल, जलालखेडा येथील विद्यार्थिनी समीक्षा राठोड हिने उल्लेखनीय कामगिरी करत द्वितीय क्रमांक पटकावला. तिच्या या यशामुळे जलालखेडा येथील शाळेच्या शैक्षणिक व वैज्ञानिक उपक्रमांच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. हा विज्ञान मेळावा गुरुवारी (दि. १७ सप्टेंबर) सकाळी १० वाजता रामन सायन्स सेंटर, नागपूर येथे पार पडला. नागपूर जिल्ह्यातील १३ तालुके आणि ५ शहर साधन केंद्रांमधून एकूण ३४ विद्यार्थ्यांनी या मेळाव्यात सहभाग घेतला. यंदाच्या मेळाव्याचा विषय 'भारतीय ऊर्जा क्षेत्र २०४७ : भवितव्य आणि आव्हाने' हा होता. सहभागी विद्यार्थ्यांनी या विषयावर आपले विचार, अभ्यासपूर्ण मते आणि भविष्यातील ऊर्जा क्षेत्रासंदभातील संकल्पना प्रभावीपणे मांडल्या. समीक्षा राठोड हिने विषयाचा सखोल अभ्यास करून आत्मविश्वासपूर्ण व प्रभावीपणे आपले विचार मांडले. तिच्या सादरीकरणातील मुद्देसूद मांडणी, विषयाचे आकलन आणि सादरीकरण कौशल्याने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. या उल्लेखनीय सादरीकरणाची दखल घेत तिला जिल्हास्तरावर द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. या यशाचे श्रेय समीक्षा राठोड हिने शाळेच्या प्राचार्य शुभांगी अर्डक, गटशिक्षणाधिकारी अक्षय भगत, पंचायत समिती नरखेड, गट साधन केंद्र नरखेडचे सुनील उजवणे, योगिता ब्राम्हणकर, केंद्रप्रमुख राजू लेंडे, विज्ञान शिक्षिका अश्विनी रेवतकर, रियाज पठाण तसेच आई-वडिलांना दिले.

कार्यक्रमाला शिक्षणाधिकारी चारुदत्त पुल्लीवार, रामन सायन्स सेंटर नागपूर, उपशिक्षणाधिकारी किरण चिनकुरे, जिल्हा परिषद नागपूर तसेच पर्यवेक्षक प्रशांत वासे, राज्य विज्ञान मंडळ नागपूर यांची उपस्थिती होती. समीक्षा राठोड हिच्या यशाबद्दल शाळेचे अध्यक्ष रणजीत देशमुख, डॉ. आशिष देशमुख, सुधीर देशमुख, अमिशी अरोरा, गणेश ठवरे, मुकेश चोपडे, कुलदीप हिवरकर आणि प्राचार्य शुभांगी अर्डक यांनी तिचे अभिनंदन केले. तिच्या यशामुळे शाळेतील विद्यार्थ्यांना विज्ञान विषयाकडे अभ्यासपूर्ण आणि संशोधनात्मक दृष्टिकोनातून पाहण्याची प्रेरणा मिळाली आहे.

## दिल्ली येथील ठिय्या आंदोलनासाठी २० सप्टेंबरला हैदराबाद येथे ओबीसींची महत्वाची बैठक

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

भारत सरकारने राजपत्राच्या प्रश्नावलीमध्ये ओबीसी साठी स्वतंत्र्य कॉलम ची सूची नसल्याने,२०२७ जनगणनेत स्वतंत्र ओबीसी कॉलमचा समावेश करण्यात यावा, या मागणीसाठी दिल्ली येथे हिवाळी अधिवेशनादरम्यान आयोजित करण्यात आलेल्या ठिय्या आंदोलनाच्या नियोजन व ओबीसींच्या प्रलंबित मागण्या संदर्भात २० सप्तेंबर २०२६ ला हॉटेल टुरिझम प्लाझा बेगमपेठ, हैदराबाद येथे सकाळी १० वाजता पासून बैठकीचे आयोजित करण्यात आलेली आहे. या बैठकीत २०२७ जनगणनेत स्वतंत्र ओबीसी कॉलमचा समावेश करण्यात यावी या मागणीसाठी दिल्ली येथे हिवाळी अधिवेशनादरम्यान होणाया ठिय्या आंदोलनाबाबत या बैठकीत चर्चा करण्यात येणार आहे. सदरची बैठक राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे, बीसी वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष जाजुला श्रीनिवास गौड, खासदार, आमदार यांच्या प्रमुख उपस्थितीत यांच्या आयोजित करण्यात आली आहे. तरी राष्ट्रीय ओबीसी महासंघ, बीसी वेल्फेअर असोसिएशनचे पदाधिकारी आणि ओबीसी संघटनाचे अध्यक्ष, सर्व जात संघटनाचे पदाधिकारी महत्त्वपूर्ण बैठकीस उपस्थित राहणार आहेत असे राष्ट्रीय ओबीस महासंघाचे महासचिव सचिन राजूरकर यांनी कळविले आहे.

# बदलत्या वीज क्षेत्रासाठी महावितरण सज्ज; तत्पर ग्राहकसेवा, महसूलवाढ, शून्य थकबाकीला प्राधान्य द्या

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



संचालक धनंजय औंढेकर यांचा जनमित्रांशी थेट संवाद

बदलत्या काळासोबत महावितरणनेही आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरली असून भविष्यातील आव्हाने पेलण्यासाठी कंपनी सज्ज झाली आहे. यासोबतच महसूलवाढ, शून्य थकबाकी आणि वीजहानी कमी करणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन संचालक (संचालन) धनंजय औंढेकर यांनी केले. स्मार्ट मीटर, छतावरील सौरऊर्जा आणि बॅटरी स्टोरेजच्या माध्यमातून वीज क्षेत्रात क्रांतिकारी बदल होत असल्याची माहिती त्यांनी जनमित्रांशी झालेल्या थेट संवाद कार्यक्रमात दिली.

चंद्रपूर आणि गडचिरोली येथे आयोजित स्वतंत्र कार्यक्रमात संचालक (संचालन) धनंजय औंढेकर यांनी प्रामुख्याने तांत्रिक कर्मचाऱ्यांसह अभियंते व अधिकाऱ्यांशी नुकताच थेट संवाद साधला. यावेळी चंद्रपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता हरिश गजबे, अधीक्षक अभियंता मनोज धाबर्डे (चंद्रपूर) व प्रकाश खांडेकर (गडचिरोली),. रमेश सानप (इन्फ्रा) यांची प्रमुख उपस्थिती होती.

संचालक (संचालन) धनंजय औंढेकर यांनी महावितरणचे मिशन आणि व्हिजन स्पष्ट करत कंपनीच्या वाटचालीबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. वीजचोरीविरुद्ध महावितरणने अत्यंत आक्रमक भूमिका स्वीकारली असून ही मोहीम यापुढेही सातत्याने सुरूच ठेवण्याचे निर्देश त्यांनी दिले. वीज वितरण व्यवस्थेची कार्यक्षमता वाढविणे, वीजग्राहकांना तत्पर व दर्जेदार सेवा देणे आणि कंपनीच्या महसुलात वाढ करणे हे अत्यंत महत्त्वाचे घटक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

संचालक औंढेकर म्हणाले, वीज वितरण क्षेत्रातील ग्राहकाभिमुख बदल म्हणून स्मार्ट मीटर अत्यंत महत्वाचे आहे. स्मार्ट मीटर बसविण्यासोबतच त्याचे प्रत्यक्ष फायदे ग्राहकांना समजावून सांगणे देखील आवश्यक आहे. स्मार्ट मीटरमुळे विजेच्या वापराबाबत ग्राहकांना अधिक अचूक व पारदर्शक माहिती उपलब्ध होईल. स्मार्ट मीटरबाबत ग्राहकांचे गैरसमज दूर करण्यासाठी ग्राहक समाधान मेळावे घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

ते म्हणाले, भविष्यात विजेची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी अक्षय ऊर्जेचा वापर वाढविणे अनिवार्य आहे. यासाठी पीएम सूर्यघर मोफत वीज योजना आणि स्मार्ट सोलर योजनेचा जास्तीत जास्त ग्राहकांनी लाभ घ्यावा यासाठी व्यापक जनजागृती करण्यात यावी. सौरऊर्जेमुळे ग्राहकांच्या वीज खर्चात थेट बचत होईल आणि स्वच्छ ऊर्जेच्या वापराला मोठा हातभार लागेल असे संचालक औंढेकर यांनी सांगितले.

वीज क्षेत्राच्या बदलांमध्ये ऊर्जा साठवणूक तंत्रज्ञानाचे महत्त्व वाढत आहे. सौर ऊर्जेची निर्मिती प्रामुख्याने दिवसाच्या वेळात होत असल्याने रात्रीच्या वेळी विजेची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढण्याची शक्यता असते. अशा वेळी दिवसा निर्माण झालेली अतिरिक्त वीज बॅटरी स्टोरेजच्या माध्यमातून साठवून ठेवून गरजेनुसार वापरणे भविष्यात अत्यंत आवश्यक ठरणार आहे. यासोबतच भविष्यातील वीज निर्मितीमध्ये हायड्रोजनसारख्या पर्यायी इंधनांचा वापर, अक्षय ऊजेर्चा वाढता वाटा आणि आधुनिक तंत्रज्ञान यामुळे ऊर्जा क्षेत्राचे स्वरूप बदलणार असल्याचे संचालक (संचालन) धनंजय औंढेकर यांनी सांगितले.

यावेळी मुख्य अभियंता हरिश गजबे म्हणाले, वीज क्षेत्रात वेगाने होणारे तांत्रिक बदल लक्षात घेता महावितरणच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नवीन तंत्रज्ञान आत्मसात करावे. वीज ग्राहकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी सर्वांनी समर्पित भावनेने, जबाबदारीने व सांघिक भावनेने काम करणे हेच महावितरणच्या यशाचा खरा आधार असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाला चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील कार्यकारी अभियंता सुहास पडोळे (चंद्रपूर), महेशचंद्र तेलंग (बल्लारशाह), विलास नवघरे (वरोरा), हितेश पारेख (गडचिरोली), जितेंद्र वाघमारे (आलापल्ली), भारतभूषण औघड (ब्रह्मपुरी) यांच्यास अभियंते, अधिकारी व तांत्रिक कर्मचारी मोठ्या संख्येत उपस्थित होते.

## लता मंगेशकर हॉस्पिटलमध्ये इंटरनॅशनल अडव्हान्स्ड आयव्हीयुएस अँड ओसीटी गाईडेड पीसीआय मास्टरक्लास संपन्न

### लता मंगेशकर विद्यापीठाच्या स्थापनेनंतरची पहिली आंतरराष्ट्रीय शैक्षणिक कार्यशाळा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

एनकेपी साळवे इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस अँड रिसर्च सेंटर व लता मंगेशकर हॉस्पिटल, हिंगणा रोड, नागपूर येथील हृदयरोग विभागातर्फे ७ ते ११ सप्टेंबर २०२६ या कालावधीत रुग्णालयाच्या कार्डियाक कॅथेटरायझेशन लॅबमध्ये पाच दिवसीय इंटरनॅशनल अडव्हान्स्ड आयव्हीयुएस अँड ओसीटी गाईडेड पीसीआय मास्टरक्लास यशस्वीपणे आयोजित करण्यात आला.

लता मंगेशकर विद्यापीठाच्या स्थापनेनंतर आयोजित करण्यात आलेली ही पहिली आंतरराष्ट्रीय कार्यशाळा ठरली. या उपक्रमामुळे आंतरराष्ट्रीय शैक्षणिक सहकार्य, प्रगत वैद्यकीय प्रशिक्षण आणि चिकित्सकीय ज्ञानाच्या देवाणघेवाणीला चालना मिळाली आहे.



लता मंगेशकर हॉस्पिटलचे डॉ. हितेंद्र भागवतकर (हृदयरोग विभाग प्रमुख) यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रात्यक्षिक प्रशिक्षण कार्यशाळा पार पडली. नेपाळमधील सहा नामांकित इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजिस्ट डॉ. अजय भट्टा, डॉ. कृष्ण अधिकारी, डॉ. संजया हुमागाईन, डॉ. निशान भट्टराई, डॉ. सुनीता मैया आणि डॉ. स्नाहा पोटे यांनी या मास्टरक्लासमध्ये सहभाग घेतला.

या प्रशिक्षणात Intrnvascular Ultrnsound (IVUS), Optical Coherence Tomography (OCT), Percutaneous Coronary Intervention (PCI) तसेच कॅथलॅबमधील अत्याधुनिक प्रक्रियांच्या प्रगत तंत्रांचा समावेश होता. प्रत्यक्ष प्रशिक्षण, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, केस डिस्कशन, लाइव्ह डेमोन्स्ट्रेशन आणि प्रगत कार्डिओव्हॅस्क्युलर इमेजिंग तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव अशी या कार्यशाळेची वैशिष्ट्ये होती.

पाच दिवसांच्या कार्यशाळेदरम्यान डॉ. भागवतकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुमारे १४ आव्हानात्मक व गुंतागुंतीच्या PTCA केसेस करण्यात आल्या. त्यामुळे सहभागी डॉक्टरांना इंट्राव्हॅस्क्युलर इमेजिंग आणि इमेज-गाइडेड PCI प्रक्रियेचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. IVUS आणि OCT यांच्या माध्यमातून हृदयाच्या रक्तवाहिन्यांमधील अडथळ्यांचे अधिक सविस्तर मूल्यांकन, उपचाराचे नियोजन आणि स्टेंटचे योग्य प्रकारे ऑप्टिमायझेशन करण्यास मदत होते. या मास्टरक्लासमुळे सहभागी डॉक्टरांना गुंतागुंतीच्या कोरोनरी इंटरव्हेन्शनमध्ये या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष वापर समजून घेण्याची संधी मिळाली.

या आंतरराष्ट्रीय मास्टरक्लासच्या यशस्वी आयोजनाबद्दल व्हीएसपीएम अकॅडमी ऑफ हायर एज्युकेशन नागपूरचे उपाध्यक्ष तथा आमदार डॉ. आशिषराव देशमुख, अधिष्ठाता डॉ. सजल मित्रा, उपअधिष्ठाता तथा वैद्यकीय अधीक्षक डॉ. नितीन देवस्थळे आणि सीओओ डॉ. अनुज तिवारी यांनी डॉ. हितेंद्र भागवतकर व हृदयरोग विभागाच्या संपूर्ण टीमचे अभिनंदन केले.

## प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे पॉलीटेक मित्रातर्फे स्वागत

### रोटरी क्लब ऑफ नागपूर ग्रीन सिटीच्या सहकार्याने स्वागत कार्यक्रम, विद्यार्थ्यांना ध्येय निश्चिती व निर्णयक्षमतेचे मार्गदर्शन




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

पॉलीटेक मित्र, शासकीय पॉलिटेक्निक नागपूरच्या माजी विद्यार्थ्यांच्या संघटने तर्फे रोटरी क्लब ऑफ नागपूर ग्रीन सिटीच्या सहकार्याने प्रथम वर्षाच्या सर्व शाखांतील विद्यार्थ्यांसाठी स्वागत कार्यक्रम आयोजित करण्यात आला. शासकीय पॉलिटेक्निक नागपूरचे प्राचार्य डॉ.आर.पी.मोगरे यांच्या उपस्थितीत डॉ. स्वाती धर्माधिकारी यांच्या हस्ते विद्यार्थी परिषदेच्या स्थापना समारंभाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी डॉ.आर.पी.मोगरे तसेच डॉ. युगल रायलू यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रेरणादायी भाषणातून डॉ.स्वाती धर्माधिकारी यांनी विविध मनोरंजक उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना योग्य ध्येय निश्चिती, संतुलित जोखीम घेण्याचे महत्त्व आणि योग्य निर्णयक्षमता याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला रोटरी क्लब ऑफ नागपूर ग्रीन सिटीच्या आयपीपी रोटेरियन पद्मा डेठे, पीपी रोटेरियन मनीषा चौधरी आणि पीपी रोटेरियन शारदा रोशनखेडे उपस्थित होत्या. पॉलीटेक मित्रचे अध्यक्ष इंजि.एस.एस. डोईफोडे, कार्यकारी अध्यक्ष डॉ. युगल रायलू, सचिव एल.एस.चक्रवर्ती यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# म्हाळगी नगर रिंग रोडवर अवैध पार्किंगचा सुळसुळाट, पादचाऱ्यांना जीव मुठीत धरून चालावे लागते

### दुर्घटना झाल्यास जबाबदार कोण? संतप्त नागरिकांचा सवाल

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

दक्षिण नागपूरातील म्हाळगी नगर ते मानेवाडा रिंग रोडवर सध्या वाहतुकीचा बोजवारा उडाला असून म्हाळगी नगर ते मानेवाडा रस्त्यावरील वाहतूक कोंडी व विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत तातडीने उपाययोजना प्रशासनाने केली पाहिजे अशी विनंती नागरिकांच्यावतीने करण्यात आली आहे.

दक्षिण नागपूर येथील म्हाळगी नगर चौक ते मानेवाडा चौक या मुख्य रस्त्यावर सध्या उड्डाण पुलाचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. या रस्त्यावरच तपस्या विद्या मंदिर आणि मेजर हेमंत जकाते शाळा या दोन मोठ्या शाळा असून दोन्ही शाळांचे मुख्यद्वार हे थेट रिंग रोडवर आहे. शाळा प्रशासनाकडे पुरेशी पार्किंग व्यवस्था नसल्याने शाळकरी मुलांच्या सायकली, दुचाकी मोठ्या प्रमाणात पादचारी



मार्गावर (फुटपाथवर) लावल्या जातात. त्यामुळे रिंग रोडवरून जाणाऱ्या वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण होतो. तसेच तपस्या विद्या मंदिर शाळेजवळ चौरस्ता असल्याने आणि शाळा भरताना व सुटताना शाळकरी मुलं-मुली याच मागार्चा वापर करत असल्याने, त्यांना सोडण्यासाठी व घेण्यासाठी येणाऱ्या पालकांच्या गाड्या, ऑटो यामुळे या भागात प्रचंड वाहतूक कोंडी होते.

एकीकडे पुलाचे काम सुरू असल्याने रस्ता अरुंद झाला आहे, तर दुसरीकडे या शाळांसमोरून जड वाहने, बसेस सतत ये-जा करतात. त्यामुळे शाळा भरते व सुटते वेळी मोठ्या दुर्घटनेची शक्यता नाकारता येत नसून शाळेने पार्किंगची व्यवस्था करावी.

या परिसरात यापूर्वी अनेक अपघात झालेले आहेत, तरीही या ठिकाणी वाहतूक पोलिसांची कायमस्वरूपी व्यवस्था नाही. स्थानिक नागरिक शिवसेना दक्षिण विधानसभा अध्यक्ष विशाल कोरके, धम्मा सोनटक्के, गौरव तिजारे, विशाल मानकर व इतर



मुख्य मार्गावर असलेल्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या सायकली अशाप्रकारे रस्त्यावरच लावल्या जातात.

रहिवाशांनी या संदर्भात वाहतूक पोलीस विभाग व महानगरपालिका प्रशासनाला वारंवार तक्रारी करूनही केवळ खानापूर्ती केली जाते, कोणतीही ठोस कारवाई केली जात नाही. वाहतूक कोंडीमुळे नागरिकांमध्ये दररोज वाद-विवाद होत आहेत. या भागात तातडीने वाहतूक पोलिसांची नियुक्ती करावी, शाळांसाठी पर्यायी पार्किंगची व्यवस्था करावी व विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी उपाययोजना करावी, अशी सर्व स्थानिक नागरिकांची मागणी आहे.

तसेच रिंग रोडवर असलेल्या सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नागपूर शहर क्र. ८ या शासकीय कार्यालयासमोरच दुचाकी आणि चारचाकी वाहने बेकायदेशीरपणे फुटपाथवर लावली जातात. या कार्यालयात रोज शेकडो नागरिकांची वर्दळ असते. कार्यालयाच्या आवारात पार्किंगची व्यवस्था नसल्याने येणारे नागरिक आपली वाहने थेट फुटपाथवर आणि रस्त्यावर लावतात.

फोटोमध्ये दिसत असल्याप्रमाणे कार आणि अनेक बाईक फुटपाथ अडवून उभ्या राहतात. त्यामुळे पादचाऱ्यांना नाईलाजाने मुख्य रस्त्यावरून चालावे लागते. या रस्त्यावर आधीच उड्डाण पुलाचे काम सुरू असल्याने रस्ता अरुंद झाला आहे. त्यातच हे अवैध पार्किंग वाहतूक कोंडीला कारणीभूत ठरत आहे. नागरिकांना याच रस्त्यावरून जीव धोक्यात घालून जावे लागते. अपघाताचा धोका असूनही वाहतूक पोलिसांचे याकडे दुर्लक्ष होत आहे.

# डॉ. केशव बळीरामपंत हेडगेवार उड्डाणपूल लोकार्पण सोहळा

शनिवार, दिनांक 19 सप्टेंबर 2026, दुपारी 4.00 वाजता | ठिकाण - जनरल मंचरशा आवारी चौक, रेशीमबाग, नागपूर.

**इंदोरा चौक–पाचपावली–अग्रसेन चौक–अशोक चौक–दिघोरी चौक**





## नागपूरच्या प्रगतीला वेग देणारा उड्डाणपूल

### कामाची संक्षिप्त माहिती

| | | | |
|---|---|---|---|
| प्रकल्पाची एकूण किंमत रु. 997.44 करोड | प्रकल्पाची लांबी 8.9 कि.मी. | उड्डाणपूलाची लांबी 6.37 कि.मी. | सर्विस रस्त्याची लांबी / स्लीप रोड 13.82 कि.मी. |

### प्रकल्पाचे वैशिष्ट्ये

- 12 मीटर रुंद, 2 लेनचा दुहेरी वाहतुकीसाठी उड्डाणपूल.
- UHPFRC तंत्रज्ञानावर आधारित रचना; कमाल स्पॅन 90 मीटर.
- 34 स्पॅन 60 मीटरचे, 2 स्पॅन 90 मीटरचे आणि उर्वरित 45 मीटरचे.
- प्रकल्पात 2 ROB आणि 2 RUB समाविष्ट.
- पाचपावली येथे जुना ROB पाडून नवीन ROB बांधण्यात आला असून विद्यमान दोन्ही रॅम्प कायम ठेवले आहेत.
- डागा मेमोरियल महिला रुग्णालय येथे सुलभ व सोयीस्कर प्रवेशासाठी चढ-उतार रॅम्प.
- अग्रसेन चौक येथे उड्डाणपूल मेट्रो मार्गिकेला पहिल्या स्तरावरून ओलांडतो.
- अशोक चौक येथे उन्नत रोटरी व प्रमुख मार्गांसाठी चढ-उतार रॅम्प.
- उड्डाणपूलाखालील रस्त्याचा विकास; मार्गिकेत 3 प्रमुख व 11 लहान चौक.

### यांच्या प्रमुख उपस्थितीत



**श्री. नितीन गडकरी**
रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री, भारत सरकार



**श्री. देवेंद्र फडणवीस**
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

कमी कालावधीत मध्य नागपूरच्या नागरिकांच्या सोयीसाठी सुविधाजनक उड्डाणपूल उभारून दिल्याबद्दल भारतीय जनता पार्टी, मध्य नागपूर, तसेच सर्व पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, समस्त कार्यकर्ते आणि मध्य नागपूरच्या जनतेच्या वतीने

**मा. श्री. नरेंद्रजी मोदी**
**मा. श्री. नितीनजी गडकरी**
**मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस**
**यांचे मनःपूर्वक धन्यवाद व आभार!**

**भारतीय जनता पार्टी, मध्य नागपूर**

SPECTRUM

थोडक्यात

## तालुक्यात सेवा संकल्प अभियानाला प्रारंभ

### मानवी रांगोळीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी दिला सेवेचा संदेश, महिनाभर विविध उपक्रमांचे आयोजन



**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

विद्यार्थ्यांनी साकारलेल्या संकल्पाच्या मानवी रांगोळीने भिवापूर तालुक्यात 'सेवा संकल्प अभियान'ला सुरुवात झाली. शासन निर्णयानुसार १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबरदरम्यान तालुक्यातील विविध शासकीय विभागांच्या समन्वयातून हे अभियान राबविण्यात येणार आहे. अभियानांतर्गत 'सेवा सेतू' शिबिरांचे आयोजन करून पात्र लाभार्थ्यांना विविध योजनांचा थेट लाभ देण्यात येणार आहे. वनहक्क दावे मंजूर करण्यासह सुमारे २२ प्रकारच्या शासकीय सेवा शिबिरांमध्ये उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. 'सेवा माझे योगदान' उपक्रमांतर्गत स्वच्छता मोहीम, रक्तदान, अवयवदान संकल्प, श्रमदान, वृक्षलागवड यासह २६ प्रकारच्या सेवांमध्ये नागरिकांचा सहभाग घेतला जाणार आहे. याशिवाय विकसित भारत संकल्प यात्रा, सेवा ज्योत यात्रा, चित्रकला व वक्तृत्व स्पर्धा, अंगणवाडी उत्सव, संकल्प रांगोळी, नमो सेवा गाथा आणि जनसेवक महाकुंभ आदी उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

विविध शासकीय योजनांच्या लाभार्थ्यांच्या घरी भेट देऊन 'आशीर्वादाचा दीप' प्रज्वलित करण्याचा उपक्रमही राबविला जाणार आहे. नागरिकांसाठी तालुकास्तरीय सेवा सेतू शिबिर आयोजित करण्यात येणार असून, विविध योजनांसाठी नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याबाबतची माहिती तहसीलदार संजय राठोड, गटविकास अधिकारी डॉ. चेतन जाधव आणि नगरपंचायत मुख्याधिकारी पार्थ सिडाम यांनी दिली.

## दामोदर राव सोनवणे यांचे निधन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

दामोदर राव सोनवणे यांचे शुक्रवारी (१८ सप्टेंबर) दुपारी नागपूर येथील एसटी कार्यालयात हृदयविकाराचा धक्का आल्याने निधन झाले. मृत्यूसमयी ते ५३ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी छाया सोनवणे तसेच कुटुंबीय, नातेवाईक व मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर शनिवारी (१९ सप्टेंबर) दुपारी १ वाजता मानेवाडा घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार.

## कुस्तीत पोरवाल कॉलेजचा डंका, हनी हैदरीची विभागीय स्पर्धेत धडक

**दै. सिंहवाणी वृत्त, कामठी**

कामठी येथील स्थानिक एस के पोरवाल कनिष्ठ महाविद्यालयातील हनी हैदरी या विद्यार्थ्यांची फ्री स्टाईल कुस्ती साठी निवड झाली



आहे.क्रीडा व युवक संचनालय पुणे अंतर्गत आयोजित जिल्हास्तरीय फ्री स्टाईल व ग्रीको रोमन कुस्ती स्पर्धा वयोगट १९ जिल्हास्तरीय स्पर्धाला कविवर्य सुरेश भट सभागृह रेशीम बाग नागपूर येथे आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये विविध कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींनी सहभाग घेतला होता. वयोगट १९ मध्ये हनी हैदरी या विद्यार्थ्यांने वेट कॅटेगिरी ९७ मध्ये आपले उत्कृष्ट प्रदर्शन दाखवत प्रतिस्पध्यार्ला चित्त केले. या विजयाने त्याची निवड विभागीय स्तराकरिता झाली. या स्पर्धेकरीता कॉलेजच्या प्राध्यापिका डॉ मल्लिका नागपुरे यांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले तसेच कॉलेजचे प्राचार्य डॉक्टर स्वप्नील दहात सर व कॉलेजचे उपप्राचार्य वंजारी व सर्व पर्यवेक्षक मेंढे व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी त्याच्या पुढील विभागीय स्तराच्या फ्री स्टाइल कुस्ती स्पर्धा करिता शुभेच्छा दिल्या.

## सोनेगाव तलाव परिसरात गणेश विसर्जन व निर्माल्य संकलनाबाबत जनजागृती कार्यक्रम



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

झोन क्र. ०१ अंतर्गत प्रभाग क्र. ३६ मधील सोनगाव तलाव परिसरात ग्रीन अर्थ ऑर्गनायझेशनच्यावतीने आज नागरिकांमध्ये गणेशमूर्तींचे विसर्जन कृत्रिम विसर्जन तलावातच करावे तसेच निर्माल्य निर्माल्य कलशामध्येच जमा करावे, याबाबत जनजागृती करण्यासाठी कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाद्वारे नागरिकांना पर्यावरणपूरक गणेश विसर्जनाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले तसेच तलावाचे पर्यावरण व स्वच्छता अबाधित ठेवण्यासाठी प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले. या कार्यक्रमास स्थायी समिती अध्यक्षा शिवानी दानी, लक्ष्मी नगर झोनचे सहाय्यक आयुक्त धनंजय जाधव, माजी आमदार अनिल सोले, झोन क्र. ०१ चे झोनल अधिकारी ऋषिकेश इंगळे सर तसेच इतर नगरसेवक, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# नागपूर स्पोर्ट्स हबच्या विकासाला गती

## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक संपन्न

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर येथील मानकापूरस्थित विभागीय क्रीडा संकुलातील 'नागपूर स्पोर्ट्स हब'सह विविध विकासकामांचा आढावा घेण्यासाठी विभागीय क्रीडा संकुल कार्यकारी समितीची आढावा बैठक पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहामध्ये आज संपन्न झाली.

आढावा बैठकीमध्ये विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, अपर आयुक्त राजेश खवले, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता संभाजी माने, क्रीडा उपसंचालक महादेव कसगावडे, जिल्हा क्रीडा अधिकारी शशीकांत कळंबे, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंता निता ठाकरे, सुनिता रावते, वास्तुविशारद ट्रान्सस्टेडियाचे संबंधित पदाधिकारी यावेळी



उपस्थित होते.

पालकमंत्री बावनकुळे यांनी 'नागपूर स्पोर्ट्स हब' प्रकल्पाच्या प्रगतीचा व विविध आंतरराष्ट्रीय क्रीडा सुविधांच्या अद्यावतीकरणाचा यावेळी आढावा घेतला. नागपूर स्पोर्ट्स हब हा अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. क्रीडा क्षेत्रासाठी ही मोठी उपलब्धी आहे. यामुळे नागपूर स्पोर्ट्स हबचे बांधकाम भविष्यकालीन योजना लक्षात घेऊन सूक्ष्म नियोजन करून करण्यात यावे. येथे कोराडीच्या धर्तीवर उच्च दर्जाचे पथदिवे लावण्यात यावेत. येथे सौर ऊर्जा प्रणालीचा सर्वत्र वापर करण्यात यावा. बांधकाम करताना सुरक्षितेच्या दृष्टीने संवेदनशील राहा, अशा सूचना पालकमंत्री बावनकुळे यांनी यावेळी दिल्या.

'नागपूर स्पोर्ट्स हब' अंतर्गत नव्याने निर्माण होत असलेल्या ११ प्रेक्षागृहांच्या कामाची सरासरी प्रगती ४४ टक्के झाली असून, यामध्ये स्पोर्ट्स कॅफेटेरियाचे काम सर्वाधिक म्हणजेच ८० टक्के पूर्ण झाले आहे. तसेच आंतरराष्ट्रीय दर्जाचा ऑलिंपिक साईझ जलतरण तलाव मिर्था पूल प्रणालीचा वापर करून उभारण्याचे काम वेगाने सुरू आहे. प्रकल्पात जुनी झाडे वाचवण्यासाठी इमारतींच्या आराखड्यात बदल करण्यात आला आहे, पालकमंत्री बावनकुळे यांनी याबाबत समाधान व्यक्त केले.

आंतरराष्ट्रीय मानकांनुसार विद्युत व्यवस्था, सी.सी. टी. व्ही. , सोलर सिस्टीम आणि ग्रीहा प्रमाणीकरणाच्या निकषांमुळे सुधारित प्रकल्प किंमत ११४४.३६ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. बैठकीदरम्यान मानकापूर येथील जुन्या इनडोअर हॉलची दुरुस्ती, वुडन फ्लोअरिंग, वातानुकूलन व अग्निशामक यंत्रणा तसेच ४०० मीटर सिंथेटिक ट्रॅक व पॅव्हेलियन इमारतीचे अद्यावतीकरण करण्यासाठी ९१.८८ कोटी रुपयांच्या प्रस्तावास प्रशासकीय मंजुरीची प्रक्रिया सुरू असल्याचे सांगण्यात आले.

याशिवाय राज्य शासनाच्या 'मिशन लक्षवेध' योजनेअंतर्गत संकुलात सुरू असलेल्या विभागीय निपुणता केंद्र व स्पोर्ट्स सायन्स सेंटरला कार्योत्तर मान्यता देण्यासोबतच बॅडमिंटन खेळाचे राज्यस्तरीय उच्चस्तर प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. संकुल परिसरातील 'युवा वसतीगृह' आवश्यक सुविधा उपलब्ध करून लवकरच युवकांसाठी कार्यान्वित करण्यात येणार आहे.

## हवालदारावर प्राणघातक हल्ला करणाऱ्याला अटक

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

दि. १६ सप्टेंबर रोजी सावनेर पोलीस स्टेशनला कार्यरत हवालदार बक्कल नं. १९३९ हे एक दिवस आधि घडलेल्या गुन्ह्याचे सुचनापत्र देण्यासाठी आरोपीच्या घरी गेले असता त्यावर आरोपीने प्लास्टिक च्या जाड पाईपाने प्राणघातक हल्ला



करुण गंभीर पणे जखमी केले होते त्यामुळे पोलीस खात्यात एकच खळबळ उडाली होती.व घटने पासून आरोपी हा फरार झाला होता.

सदर घटनेने सावनेर पोलीस स्टेशनचे आधिकारी यांचे शहरातील गुन्हेगारी प्रवुत्तीवर अंकुश नसल्याचे दिसून येत अवैध व्यवसायी पोलिसांना मारहाण करण्या इतकी हिम्मत करु शकतात तर सामान्य नागरिकांचे काय?,अश्या टवाळखोर अवैध व्यवसायीक व गुन्हेगारी प्रवुत्तीच्या लोकांपासून सामान्य नागरिकांना व सावनेर पोलीस स्टेशन अंतर्गतच्या कायदा व सुव्यवस्थेचे काय असा सवाल नागरिकांतुन होऊ लागला आहे. हवालदारास मारहाण करणारा आरोपी फरार असल्याने त्यास जेरबंद करुण त्यास कायद्याच्या तावडीत घेण्यासाठी सावनेर पोलिसांनी ठिकठिकाणी पाळत ठेवली.

अश्यात आरोपी अमन आसाराम धनोले राहणार हरिभाऊ आदमाने कॉलेज यास पोलीस हवालदारास अमानुष मारहाण या गुन्ह्यात अटक करून त्याच्याकडून गुन्ह्यात वापरलेला जाड प्लास्टिक पाईप जप्त करून त्याने गुन्ह्याची कबुली दिली असून गुन्ह्यात फिर्यादी यांचे मेडिकल रीपोर्ट रिपोर्ट वरून गुन्ह्यात कलम १०९ (१) बी एन एस ची वाढ करण्यात आली असुन त्यास सावनेर न्यायालयात पेश करण्यात आले.

## कराटे स्पर्धेत येणिकोणीच्या इंदिरा गांधी हायस्कूलचा दबदबा!

### तब्बल १७ विद्यार्थ्यांनी पटकावले प्रथम क्रमांक, जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी दमदार वाटचाल

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

नागपूर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने आयोजित शालेय विद्यार्थ्यांच्या नरखेड तालुकास्तरीय कराटे स्पर्धेत येणिकोणी येथील इंदिरा गांधी हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत आपला दबदबा निर्माण केला. विविध वयोगट व वजनगटांत शाळेच्या तब्बल १७ विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले. विद्यार्थ्यांच्या या कामगिरीमुळे शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती आली.

नरखेड येथील तालुका क्रीडा संकुलात पार पडलेल्या या स्पर्धेत १४ वर्षांखालील मुलींच्या गटात २२ किलो वजनगटात नव्या



बाल्या नेहारे, २४ किलोमध्ये रागिणी कैलास नेहारे, ३० किलोमध्ये ज्योती भूपेंद्र डुबगया, ३४ किलोमध्ये तनिष्का अनिल नरवरे, ३८ किलोमध्ये प्रियंका हेमराज उईके, ४४ किलोमध्ये पूर्वी राजकुमार घोरपडे आणि ५० किलोमध्ये जानवी मुन्ना कुमरे यांनी प्रथम क्रमांक मिळविला.

१४ वर्षांखालील मुलांच्या गटात ३० किलो वजनगटात मंथन अनिल डाखोळे, तर ३४ किलोमध्ये नैतिक सुभाष चामलाटे यांनी बाजी मारली.

१७ वर्षांखालील मुलींच्या गटात ३६ किलोमध्ये गौरी मन्नू सलामे, ४० किलोमध्ये अंतरा सुनील डाखोळे, ४४ किलोमध्ये प्राची धनराज रेवतकर, ४८ किलोमध्ये दिव्या सुरेश युवनाती आणि ५२ किलोमध्ये लक्ष्मी सदाशिव बिहारे यांनी प्रथम क्रमांक पटकावला.

तर १७ वर्षांखालील मुलांच्या गटात ४० किलोमध्ये नैतिक शामराव निहारे, ४४ किलोमध्ये नैतिक जगन्नाथ ठाकरे आणि ६८ किलोमध्ये सोहम रत्नदीप खापरे यांनी प्रथम क्रमांक मिळवत दमदार कामगिरी केली.

स्पर्धेच्या यशस्वितेसाठी नरखेड तालुका क्रीडा संयोजक महादेव नवघरे यांनी विशेष परिश्रम घेतले. राष्ट्रीय पंच म्हणून जगदीश मधुकर मानकर व विशाल धनराज पंचभाई यांनी जबाबदारी सांभाळली.

विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक सुधीर आंडे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या या कामगिरीमुळे शाळेच्या क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, आगामी स्पर्धांमध्येही हे विद्यार्थी चमकदार कामगिरी करतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## 'वसंत स्मृती' स्मृतिग्रंथाचे २० सप्टेंबरला प्रकाशन

### स्वर्गीय वसंतराव (बापूसाहेब) साठे यांच्या जन्मशताब्दी निमित्त स्मृतिग्रंथाचे प्रकाशन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

स्वर्गीय वसंतराव (बापूसाहेब) साठे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या जीवनकायार्ला, विचारांना, मूल्यांना, सार्वजनिक योगदानाला आणि प्रेरणादायी स्मृतींना समर्पित 'वसंत स्मृती' या स्मृतिग्रंथाचा प्रकाशन सोहळा रविवार, २० सप्टेंबर रोजी दुपारी १ वाजता आयोजित करण्यात आला आहे. हा प्रकाशन सोहळा नितीनजी गडकरी यांच्या महाल, नागपूर येथील निवासस्थानी होणार आहे. स्व. वसंतराव (बापूसाहेब) साठे यांच्या कायार्चा आणि विचारांचा गौरव करणाऱ्या या स्मृतिग्रंथाच्या प्रकाशन सोहळ्यास मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

'वसंत स्मृती' हा ग्रंथ त्यांच्या सामाजिक व सार्वजनिक जीवनातील योगदानाची तसेच प्रेरणादायी आठवणींची नोंद करणारा स्मृतिग्रंथ आहे. या संस्मरणीय सोहळ्यास नागरिकांनी, हितचिंतकांनी व स्नेहीजनांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. स्मृतिग्रंथाचे मुख्य संपादक प्रभाकर दुपारे, संपादक डॉ. उदय बोधनकर आणि सहसंपादिका सुनीती बोधनकर यांनी उपस्थितीचे सस्नेह निमंत्रण दिले आहे.

## मानकर ट्रस्टतर्फे एक लाख आदिवासी विद्यार्थ्यांच्या मातांना जीवन व वैयक्तिक अपघात विमा संरक्षण

### केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत २० सप्टेंबरला नागपुरात उपक्रमाचा शुभारंभ

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

कै. लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्था (मानकर ट्रस्ट) तर्फे संस्थेच्या एकलव्य एकल विद्यालयांमध्ये शिक्षण घेणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या मातांना जीवन विमा आणि वैयक्तिक अपघात विमा संरक्षण देणाऱ्या महत्त्वपूर्ण सामाजिक उपक्रमाचा शुभारंभ रविवार, दि. २० सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता गडकरी वाडा, महाल, नागपूर येथे होणार आहे. संस्थेचे प्रेरणास्त्रोत व मार्गदर्शक केंद्रीय मंत्री आदरणीय नितीन गडकरी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न होईल.

शुभारंभ कार्यक्रमात प्रातिनिधिक स्वरूपात १० आदिवासी विद्यार्थ्यांच्या मातांना केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांच्या हस्ते विमा प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात येणार आहे. या उपक्रमाद्वारे टप्प्याटप्प्याने एक लाख आदिवासी विद्यार्थ्यांच्या मातांना विमा संरक्षण देण्याचे व्यापक उद्दिष्ट मानकर ट्रस्टने ठेवले आहे.

या शुभारंभ सोहळ्यास संस्थेचे अध्यक्ष अतुल शिरोडकर, उपाध्यक्ष राजीव हडप व मुरलीधर चांदेकर, सचिव प्रशांत बोपर्डीकर, कोषाध्यक्ष सी.ए. मिलिंद कानडे, तसेच संस्थेचे विश्वस्त, पदाधिकारी आणि या उपक्रमाशी संबंधित विविध संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.

**कुटुंबाचा आधार असलेल्या मातेला आर्थिक संरक्षण**

मानकर ट्रस्टच्या माध्यमातून विदर्भातील दुर्गम भागांमध्ये सध्या सुमारे १,३२८ एकलव्य एकल विद्यालये चालविण्यात येत असून, त्यामध्ये जवळपास ३७,१८४ आदिवासी विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या प्रत्येक विद्यार्थ्यामागे आपल्या कुटुंबासाठी दररोज कष्ट करणारी एक माता आहे.

यापैकी अनेक महिला शेतात, जंगलात तसेच शारीरिक श्रमाची आवश्यकता असलेल्या विविध ठिकाणी काम करून आपल्या कुटुंबाच्या उदरनिवार्हाला हातभार लावतात. या परिस्थितीत काम करताना त्यांना अपघात, सर्पदंश, वन्यप्राण्यांशी होणाऱ्या धोकादायक घटना आणि इतर अनपेक्षित जोखमींचा सामना करावा लागू शकतो.

मर्यादित आणि अनेकदा अनिश्चित उत्पन्न असलेल्या कुटुंबात कमावत्या किंवा कुटुंबाला आर्थिक हातभार लावणाऱ्या महिलेचा गंभीर अपघात किंवा दुर्दैवी मृत्यू झाल्यास त्याचे परिणाम केवळ त्या घटनेपुरते मर्यादित राहत नाहीत. त्याचा परिणाम संपूर्ण कुटुंबाच्या आर्थिक सुरक्षिततेवर, उपजीविकेवर आणि विशेषतः मुलांच्या शिक्षण व भवितव्यावर होऊ शकतो.

या विमा उपक्रमाचा उद्देश या महिलांना आणि त्यांच्या कुटुंबांना जीवनाशी संबंधित तसेच वैयक्तिक अपघातामुळे उद्भवणाऱ्या निश्चित जोखमींविरुद्ध आर्थिक सुरक्षा कवच उपलब्ध करून देणे हा आहे.

**शिक्षणासोबत आता कुटुंबाच्या आर्थिक सुरक्षिततेकडेही पाऊल**

मानकर ट्रस्ट अनेक वर्षांपासून एकलव्य एकल विद्यालयांच्या माध्यमातून दुर्गम व आदिवासी भागातील मुलांपर्यंत शिक्षण पोहोचविण्याचे कार्य करत आहे. हा नवा उपक्रम त्या सामाजिक बांधिलकीचा पुढचा टप्पा आहे.

केवळ मुलाला शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे एवढाच या उपक्रमामागचा विचार नाही, तर त्या मुलाच्या पाठीशी उभ्या असलेल्या कुटुंबाची आर्थिक सुरक्षितता अधिक मजबूत करणे हेदेखील त्याचे उद्दिष्ट आहे.

**अनेक संस्थांच्या सहकार्यातून साकारलेला उपक्रम**

हा उपक्रम प्रत्यक्षात आणण्यासाठी दिलेल्या सहकार्याबद्दल मानकर ट्रस्ट IndusInd Nippon Life Insurance Company Limited, The New India Assurance Company Limited, Xperitus Insurance Brokers Private Limited And Seva Tech Limited या संस्थांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो.

या उपक्रमाची संकल्पना मांडणे, त्याचे समन्वयन करणे आणि त्यासाठी आवश्यक असलेल्या विविध संस्थांना एकत्र आणणे यासाठी किरण कुलकर्णी आणि निमिष खट्टर यांनी घेतलेल्या पुढाकार घेतला.

थोडक्यात

## बिजली गिरने से युवक की मौत

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**



कहते हैं मुसिबत कभी अकेले नही आती उसकी प्रचिति आज यहां साबित हुई.आम का विशालकाय पेड़ गिरने से मृत मुश्ताक शाह का ममेरा भाई साहिल सत्तार शेख (२३ वर्ष,सर्वोदय नगर,पानी टंकी,सावनेर) करीब ४ बजे बकरियों के लिए चारा लाने खेतों घर से कुछ दूरी पर गयाथा उसी दौरान तेज हवा,बिजली व बारिश शुरू हो गई.साहिल जिस पेड़ के पास खड़ा था वहा बिजली आकर गिरी जिससे वह झुलस गया. सरकारी अस्पताल में लाने पर चिकित्सकों ने उसे मृत घोषित किया.मृतक साहिल नागपुर में फलों का व्यवसाय करता था जिस पर घर का खर्च निर्भर था.सगे रिश्तें के २ युवाओं के साथ हुई इस दुर्घटना से समाज मन सुन्न हैं.

## निर्मला कोटंबे यांचे निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



ओंकार नगर निवासी निर्मला नत्थुजी कोटंबे यांचे आज सकाळी वयाच्या ८४ व्या वर्षी दिनांक १८ सप्टेंबर रोजी निधन झाले. त्या नाट्यकलावंत वंदना जीवने, मिलिंद कोटंबे, प्रमोद कोटंबे, तारका, भारती अलोने यांच्या आई होत्या. नाटककार रंगकर्मी संजय जीवने यांच्या त्या सासू होत्या. त्यांच्या मागे सुना, नातवंड असा मोठा परिवार आहे. त्यांचा पार्थिवावर अंत्यविधी शनिवारी सकाळी १०:०० वाजता मानेवाडा घाट, नागपूर येथे करण्यात येणार आहे.

## गणेशोत्सवात सट्टापट्टीवर वाडी पोलिसांचा छापा

### 'कल्याण ओपन'च्या सट्ट्यावर खायवाडी करणाऱ्यांवर कारवाई, १,१९० रुपयांचा मुद्देमाल जप्त

**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**

गणेशोत्सवाच्या काळात अवैध सट्टा-जुगाराला आळा घालण्यासाठी वाडी पोलिसांनी कारवाईचा धडाका सुरू ठेवला आहे. याच मोहिमेअंतर्गत सट्टापट्टीवर खायवाडी करून आर्थिक फायदा मिळविण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका इसमावर पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत रोख रकमेसह सट्ट्याचे आकडे लिहिलेली चिठ्ठी व पेन असा एकूण १,१९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आशिष विनोद धनवटे (वय ३०) हा गझल बारच्या बाजूला सार्वजनिक रस्त्यालगत असलेल्या मोकळ्या जागेत सट्टापट्टीवर खायवाडी करीत असल्याची गोपनीय माहिती वाडी पोलिसांना मिळाली होती. माहितीच्या आधारे पोलिसांच्या पथकाने १८ सप्टेंबर रोजी सायंकाळी सुमारे ४.२० ते ४.५० वाजताच्या दरम्यान घटनास्थळी कारवाई केली.

यावेळी धनवटे याच्याकडून खायवाडीचे १,१८० रुपये, 'कल्याण ओपन' असा उल्लेख असलेली तसेच सट्ट्याचे आकडे लिहिलेली निळसर रंगाची कागदी चिठ्ठी आणि १० रुपये किमतीचे एक पेन जप्त करण्यात आले. जप्त करण्यात आलेला मुद्देमाल पंचांसमक्ष जप्ती पंचनाम्यानुसार ताब्यात घेण्यात आला. या प्रकरणी पोलीस हवालदार सोमेश्वर वर्धे यांच्या फिर्यादीवरून आशिष धनवटे याच्याविरुद्ध महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२(अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा क्रमांक ६२०/२०२६ असून पुढील तपास वाडी पोलीस करीत आहेत. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर अवैध सट्टा-जुगारासह समाजातील गैरप्रकारांवर पोलिसांची करडी नजर असून, अशा प्रकारच्या कारवायांमुळे परिसरातील अवैध धंद्यांना आळा घालण्यास मदत होणार आहे.

## माथनी येथे भाजपा व भाजयुमोतर्फे सेवा संकल्प अभियान




**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू-मौदा**

भारत देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७६व्या वाढदिवसानिमित्त सेवा संकल्प अभियानांतर्गत 'आशीवार्दाचा दिवा' हा प्रेरणादायी कार्यक्रम माथनी येथे भारतीय जनता पार्टी व भारतीय जनता युवा मोर्चाच्या माध्यमातून उत्साहात आयोजित करण्यात आला. याप्रसंगी भाजयुमो नागपूर जिल्हा ग्रामीण (रामटेक) उपाध्यक्ष तथा कार्यक्रम समन्वयक वीरेंद्र पायतोडे, दक्षता समिती, मौदा तालुका सदस्य मंगेश तिघरे, माजी सदस्या पंचायत समिती मौदा पुनम तिघरे,बूथप्रमुख माथनी स्वप्निल तिघरे, ऋषभ घोल्लर,तसेच माथनी गावातील भाजपा व भाजयुमोचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते. सेवा, समर्पण आणि राष्ट्रनिमार्णाचा संकल्प घेऊन भारताचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दीप प्रज्वलित करून, 'सेवा हाच संकल्प, राष्ट्रनिर्माण हाच ध्यास' अशा घोषणा देत वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या.

## तामिळनाडूत १५३०० कोटी गुंतवणूक

**चेन्नई :** तामिळनाडूचे मुख्यमंत्री थलपती विजय नुकतेच लंडन दौऱ्याहून परतले आहेत. विजय मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांचा हा पहिलाच अधिकृत परदेश दौरा होता. मुख्यमंत्री विजय यांचा हा दौरा यशस्वी झाल्याचा दावा तामिळनाडू सरकारकडून करण्यात आला आहे. या दौऱ्यातून तामिळनाडूमध्ये सुमारे १५ हजार ३०० कोटींची गुंतवणूक येणार असून, १० हजारांहून अधिक नोकऱ्या मिळू शकतात, असे म्हटले जात आहे. तामिळनाडू सरकारने मुख्यमंत्री थलपती विजय यांचा पहिला अधिकृत परदेश दौरा गुंतवणूक आणि औद्योगिक विकासासाठी महत्त्वपूर्ण असल्याचे म्हटले आहे.

# विदर्भातील ३० उत्कृष्ट शिक्षकांचा 'गुरुरत्न' पुरस्काराने सन्मान

### डॉ. सुहासिनी वंजारी यांना जीवनगौरव पुरस्कार, शिक्षकांच्या कार्याचा गौरव सोहळा उत्साहात




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

औदुंबर बहुउद्देशीय सामाजिक शिक्षण संस्थेच्यावतीने शिक्षक दिनाचे औचित्य साधून नागपूरसह विदर्भातील शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ३० उत्कृष्ट शिक्षकांचा गुरुरत्न पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. नुकताच रविवारी १३ सप्टेंबर रोजी, डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात पुरस्कार वितरण सोहळा उत्साहपूर्ण पार पडला.

कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार विकास ठाकरे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी सर्वपल्ली राधाकृष्णन, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमांना माल्यार्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात सोमलवार हायस्कूल, रामदासपेठ येथील विद्यार्थ्यांनी कॅप्टन विजय नाईक यांच्या नेतृत्वाखाली दिलेल्या सैनिकी मानवंदनेने झाली. रॉयल गोंडवाना पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर केले. सुवतीदेवी झुनझुनवाला हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी समूह नृत्य सादर करून उपस्थितांची दाद मिळवली, तर स्व.प्रकाशभाऊ उमाटे शाळेच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या सन्मानार्थ पथनाट्य सादर केले. डॉ. सुहासिनी वंजारी यांना जीवनगौरव कार्यक्रमातील विशेष आकर्षण ठरलेल्या सत्रात शिक्षण क्षेत्रातील ख्यातनाम व्यक्तिमत्त्व डॉ. सुहासिनी गोविंदराव वंजारी यांना आमदार विकास ठाकरे यांच्या हस्ते 'जीवनगौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. प्रशस्तीपत्र, स्मृतिचिन्ह, शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत हा गौरव करण्यात आला.

यावेळी निधी वनचे संचालक मनोज कुंभारे आणि वेदचे संचालक चंद्रप्रकाश चतुर्वेदी यांनी शिक्षकांच्या सन्मानासाठी आयोजित या उपक्रमाला सामाजिक भावनेतून सहकार्य केल्याचे सांगितले. 'विशेष गुणरत्न' पुरस्कारानेही गौरव शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात क्रियाशील राहून परीक्षक म्हणून जबाबदारी सांभाळणाऱ्या मान्यवरांचाही यावेळी विशेष सन्मान करण्यात आला.

डॉ. मंदा उमाठे, डॉ. प्रज्ञा देशपांडे, डॉ. वंदना बडवाईक, मेधा नवसाळकर, अमेय एदलाबादकर, कविता पवार, शालिनी तेलरांधे, डॉ. शारदा रोशनखेडे, प्राचार्य सुभाष खाकसे, डॉ.पितांबर उरकुडे, डॉ.शुभ्र रॉय, कॅप्टन विजय नाईक, लक्ष्मी मोझरकर, संजय पुंड, आरती भोसले, डॉ.शारदा मंडवगडे आणि श्रीवंत शेंडे यांना प्रशस्तीपत्र, भेटवस्तू व पुष्पगुच्छ देऊन 'विशेष गुणरत्न पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात माजी आमदार सुधाकर कोहळे, मानव विकास संस्थेचे अध्यक्ष राजाभाऊ जोध, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य अजय अग्रवाल, प्राचार्य उदय टेकाडे, उपशिक्षण अधिकारी रमेश हरडे, गौतम गेडाम, हरीश अरोरा, शरद देशमुख आणि अनिल अहिरकर यांच्या हस्ते नागपूर व विदर्भातील ३० उत्कृष्ट शिक्षकांना 'विशेष गुरुरत्न पुरस्कार' प्रदान करण्यात आला. पुरस्कारार्थी शिक्षकांना प्रशस्तीपत्र, भेटवस्तू आणि पुष्पगुच्छ देऊन त्यांच्या शैक्षणिक कायाचा गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच सामाजिक बांधिलकी जपत शिक्षण क्षेत्रात योगदान देणाऱ्या शिक्षकांच्या कायाची दखल घेण्यासाठी या पुरस्काराचे आयोजन करण्यात आले होते. प्रस्तावना आयोजिका भाग्यश्री पवार यांनी तर संचालन आर. जे. मोना यांनी केले, तर शालिनी तेलरांधे यांनी आभार मानले.

या सोहळ्याला मोठ्या संख्येने शिक्षक, त्यांचे कुटुंबीय, शिक्षण क्षेत्रातील मान्यवर तसेच शिक्षणप्रेमी नागरिक उपस्थित होते. शिक्षकांच्या कार्याचा गौरव करणाऱ्या या उपक्रमामुळे कार्यक्रमाला सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## विज्ञानवादी महापुरुषांच्या कार्याला दर्शवत श्री गणरायाची स्थापना



**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

कन्हान पिपरी वॉर्ड क्र. ७ येथे सामाजिक कार्यकर्ते प्रशांत बाजीराव मसार यांच्या घरी बाल गोपाल यांनी विज्ञानवादी महापुरुष यांचा उत्तम कायार्ला दाखवून छान सजावट करून गणपती विराजमान केले. त्यांचे कौतुक करण्याकरिता आज महावितरण कंपनीचे कनिष्ठ अभियंता श्रीवास्तव यांनी भेट दिली. अनेक मान्यवरांनी बाप्पाचे दर्शन घेत आशिर्वाद घेतले.

## कोदामेंढी परीसरात विजेच्या कडकडाट एक तास मुसळधार पाऊस



**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू -मौदा**

पावसाळा लागला की बळीराजा आपल्या शेतीच्या कामात व्यस्त होतो. परंतु यावर्षी कोदामेंढीसह परीसरात व संपूर्ण मौदा तालुक्यात पाहिजे तसा पाऊस पडला नसल्याने बळीराजा पहीलेच चिंतेत आहे. नदी नाल्यांना पुर पहायला मिळाला नाही. विहीरी तुडुंब भरल्या नाही.तलाव अर्ध्यावरच समाधान मानून उभे ताटकळत आहेत. पावसाळा संपला. सप्टेंबर महिना अर्ध्यावर गेला. गणरायाचे आगमन झाले. परतीच्या पावसाने हजेरी लावली.

आज शुक्रवार (ता. १८ सप्टेंबर) ला सायंकाळी साडेसहा वाजताच्या सुमारास विजेच्या कडकडाट सह वादळी वाऱ्याने सुरुवात केली व एक तास मुसळधार पाऊस कोसळला आणि त्यानंतर पावसाची रिप रिप सुरू झाली बातमी लिये पर्यंत पावसाची रिप रिप सुरूच होती. यामुळे बळीराजा अल्पसा सुखावला असल्याचे भासवत आहे. परंतु अजूनही नदी - नाल्यांना पूर येईल, विहिरी तुडुंब भरतील, अशा मुसळधार पावसाची प्रतीक्षा कायम आहे, हे विशेष!

## आम का पेड़ दुकान पर गिरने से एक की मौत, दूसरा घायल

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**



शुक्रवार की शाम ४.३० बजे के करीब स्थानीय मराविमं कार्यालय के पास स्थित आम का विशाल पेड़ वाहन सुधारने की दुकान पर गिरने से दुकान के मालिक मुश्ताक गुलाम शाह (४५ वर्ष,चिचपुरा,सावनेर) की दुकान में दबकर मौत हो गई वही उनका सहकर्मी सचिन दियेवार (४३ वर्ष, गड़ेगांव, सावनेर) बुरी तरह घायल हुआ. शाम को क्षेत्र में मौसम ने अचानक रूख बदला व तेज हवा व बिजली के साथ बारिश होने लगी.छिंदवाड़ा मार्ग परी मराविमं कार्यालयके पास आम के पेड़ के निचे वाहन काकाम करने वाले मुश्ताक का कई वर्षों से गॅरेज हैं. एक प्रत्यक्षदर्शी ने बताया की अचानक एक बिजली उक्त आम के पेड़ पर गिरी जिससे भीमकाय पेड़ उखड़कर दुकान पर जा गिरा. जिससे मुश्ताक,सचिन व अन्य एक व्यक्ति वहां दब गए.दोनों को थोड़ी देर में बाहर निकाल लिया गया लेकिन मुश्ताक उसमें बुरी तरह फंस गए जिन्हे २ घंटे की कड़ी मशक्कत के बाद क्रेन व जेसीबी की सहायता से बाहर निकाला गया. लेकिन सिर में ज्यादा मार होने से उनकी मौत हो चुकी थी. उनके शव को सावनेर रूग्नालय पहुंचाया गया जहां शनिवार को पोस्टमार्टम किया जाएगा. मृतक काफी मिलनसार स्वभाव का व परिवार में छोटे-छोटे बच्चें व पत्नी का सहारा छीन जाने से लोगों में गम का माहौल हैं.

### रशियन तेल खरेदीदारांवर मोठे शुल्क?

**वॉशिंग्टन :** रशियावर आर्थिक निर्बंध लावण्यासोबतच भारत आणि चीनसारख्या रशियाच्या तेल व वायूच्या व्यापार भागीदार देशांवर मोठे शुल्क लावण्याचा अधिकार अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना देणाऱ्या विधेयकाला अमेरिकेच्या प्रतिनिधीगृहाने मंजुरी दिली आहे. या विधेयकामुळे रशियन ऊर्जा खरेदी करणाऱ्या देशांवर अमेरिकेकडून आर्थिक दबाव वाढण्याची शक्यता आहे.

# 'मिशन सायबर फिट इंडिया'अंतर्गत सायबर हायजीन, सायबर एथिक्स आणि डिजिटल जबाबदारीवर जनजागृती

**दै. सिंहवाणी वृत्त, कामठी-नागपूर**

'मिशन सायबर फिट इंडिया' उपक्रमांतर्गत एडुसन फाउंडेशनच्या वतीने व नागपूर पोलिस सायबर सेलच्या सहकार्याने एम. एम. रब्बानी हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, कामठी-नागपूर येथे सायबर हायजीन व सायबर एथिक्स या विषयावर सायबर जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत इयत्ता ९वी ते १२वीतील ५०० हून अधिक विद्यार्थ्यांनी दोन सत्रांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.






कार्यशाळेत विद्यार्थ्यांना ऑनलाइन गेमिंग फ्रॉड, बनावट लोन अॅप्स, मालिशियस अढङ फाइल्स, सायबर बुलिंग, फसवे कॉल व संदेश, डिजिटल अरेस्ट व विविध प्रकारच्या ऑनलाइन फसवणुकीपासून सुरक्षित राहण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

नागपूर पोलिसांच्या सायबर सेलच्या रिसोर्स पर्सन आचल चितारे यांनी विद्यार्थ्यांना विविध सायबर धोक्यांची माहिती देत अनोळखी अप्लिकेशन डाउनलोड करू नये तसेच संशयास्पद लिंक, संदेश व ऑनलाइन ऑफर्सपासून सावध राहण्याचे आवाहन केले.

एडुसन फाउंडेशनचे संचालक निलेश एच. काळे यांनी डिजिटल फुटप्रिंटचे महत्त्व स्पष्ट करताना सोशल मीडियावर कोणतीही पोस्ट, माहिती किंवा प्रतिक्रिया देण्यापूर्वी विचार करण्याचा सल्ला दिला. OTP, पासवर्ड, PIN, बँकिंग माहिती किंवा इतर गोपनीय माहिती कोणत्याही अनोळखी व्यक्तीस देऊ नये तसेच संशयास्पद किंवा फसव्या कॉलला प्रतिसाद देऊ नये, असे त्यांनी सांगितले.

मोबाईल फोन आणि सोशल मीडियाच्या अतिवापरामुळे एकाग्रता, वाचनाची सवय, शैक्षणिक कामगिरी आणि करिअर विकासावर होणाऱ्या संभाव्य परिणामांबाबतही त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी वाचनाची सवय, स्वतंत्र विचार आणि समस्या सोडविण्याची क्षमता विकसित करावी, असे आवाहन करण्यात आले. तसेच ChatGPT सारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग अध्ययनासाठी सहाय्यक साधन म्हणून करावा; मात्र स्वतःची विचारशक्ती व शिकण्याची प्रक्रिया तंत्रज्ञानावर अवलंबून राहू नये, असा संदेश देण्यात आला.

कार्यशाळेत झालेल्या प्रश्नोत्तर सत्रात विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षेशी संबंधित विविध प्रश्न उपस्थित केले. तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना व्यावहारिक मार्गदर्शनातून उत्तरे दिली. कार्यक्रमाला एडुसन फाउंडेशनचे संचालक निलेश एच. काळे, नागपूर पोलिसांच्या सायबर सेलच्या रिसोर्स पर्सन अचल चितारे, प्राचार्य मसरूर अहमद, सहायक मुख्याध्यापक प्रा. सजिद अहमद खान आणि पर्यवेक्षक नसीम अहमद यांची उपस्थिती होती.

कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी एडुसन फाउंडेशनने एम. एम. रब्बानी हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य, सहायक मुख्याध्यापक, व्यवस्थापन व शिक्षकवृंद यांचे आभार मानले. तसेच रुबिना नेयाजी, एम. खलीक सानी आणि फुरकाना जाबीन यांच्या सहकार्याबद्दल विशेष कौतुक करण्यात आले.

५०० हून अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग असलेली ही कार्यशाळा सायबर सुरक्षितता, डिजिटल जबाबदारी, सायबर एथिक्स आणि तंत्रज्ञानाच्या सुरक्षित वापराबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण उपक्रम ठरली.